
RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com
E-Mail : prajasattaknews24@gmail.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026





❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १५२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १० जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## दिल्ली-एनसीआरमध्ये भूकंपाचे धक्के, घर-कार्यालय सोडून नागरिकांची मोकळ्या जागांकडे धाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

दिल्ली एनसीआर भागात गुरुवारी (१० जुलै) सकाळी मुसळधार पाऊस चालू असतानाच भूकंपाचे धक्के बसले. १० सेकंद जमीन हादरत होती. त्यामुळे अनेक घरे व इमारतींमधील लोक सुरक्षेसाठी घराबाहेरच्या मोकळ्या जागांमध्ये जमले होते. सकाळी ९.०४ वाजता भूकंपाचे हादरे बसले. दिल्ली, नोएडा, गाझियाबाद, गुरुग्राम, फरीदाबाद, रोहतक, हिसार व सोनीपत भागात भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले. हरियाणातील झज्जर गावात या भूकंपाचं केंद्र होतं. या भूकंपाची तीव्रता ४.४ रिष्टर स्केल इतकी होती.




दिल्लीत भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. मात्र, काही वेळ घरांचे दरवाजे व खिडक्या हलताना दिसल्या. त्यामुळे लोक घरं, दुकानं व कार्यालयं सोडून बाहेर पडले. या भूकंपामुळे दिल्लीतील मेट्रोसेवा काही वेळ थांबवण्यात आली होती. या भूकंपामुळे कुठेही नुकसान झाल्याची माहिती समोर आलेली नाही.

दिल्लीत सध्या मुसळधार पाऊस चालू आहे. अनेक ठिकाणी रस्ते पाण्याखाली गेले आहेत. रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली आहे. अशातच भूकंपाचे धक्के जाणवल्यामुळे लोक घाबरले होते.

## शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांच्या अडचणी वाढल्या; पुण्यात तक्रार दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० पुणे**

आमदार निवासच्या कॅन्टीनमध्ये निकृष्ट जेवण दिल्यामुळे आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कर्मचाऱ्याला बेदम मारहाण केल्याचा प्रकार घडला आहे. या प्रकरणानंतर पुणे पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. यामुळे आमदार संजय गायकवाड यांच्या अडचणी वाढल्याचे दिसून येत आहे.



पावसाळी अधिवेशन सुरु असून आमदार संजय गायकवाड हे मुंबईत आहेत. दरम्यान ते आकाशवाणी आमदार निवासात मुक्कामी असताना आमदार निवासच्या कॅन्टीनमध्ये निकृष्ट दर्जाचे आणि शिळे अन्न मिळाल्याच्या कारणातून संजय गायकवाड यांना राग अनावर आला. यातून आमदार गायकवाड यांनी कॅन्टीनच्या कर्मचाऱ्याला बेदम मारहाण केली आहे. हा मुद्दा अधिवेशनाच्या सभागृहात देखील मांडण्यात आला.

दरम्यान हा प्रकार घडल्यानंतर आमदार संजय गायकवाड यांच्या विरोधात पुणे पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पिंपरी चिंचवड युवक अध्यक्ष यांची तक्रार असून चेतन पवार या अर्जदाराने गायकवाड यांच्या विरोधात तक्रार दिली आहे. तसेच संजय गायकवाड यांनी कॅन्टीन चालकाला मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी देखील करण्यात आली आहे.

## बाहेर ये तुला दाखवतो, तू तर बूट...

### अनिल परबांनी 'गद्दार' म्हणताच शंभूराज देसाई भडकले, विधान परिषदेतच जुंपली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

मुंबईत मराठी माणसाला घरांसाठी आरक्षण मिळावे या मुद्द्यावर राज्य सरकारचे मंत्री आणि शिंदे गटाचे नेते शंभूराज देसाई आणि शिवसेना उबाठा पक्षाचे आमदार अनिल परब यांच्यात सभागृहात शाब्दिक चकमक झाली. मराठी माणसाला मुंबईत घरांसाठी आरक्षण मिळावे, यासाठी कायदा तयार करण्यात यावा, अशी मागणी अनिल परब यांनी केली. मात्र, यावरून वादाला सुरुवात झाली आणि शंभूराजे देसाई यांनी अनिल परबांना बाहेर ये तुला दाखवतो, अशी धमकी दिली. यानंतर सभागृहात एकच गोंधळ उडाला आणि उपसभापती निलम गोऱ्हे यांनी सभागृह १० मिनिटांसाठी तहकूब केले.




सभागृहात बोलताना आमदार अनिल परब यांनी मुंबईत मराठी माणसाच्या घरांचा मुद्दा उपस्थित केला. मुंबईतील प्रत्येक नवीन इमारतीत बिल्डरने ४० टक्के घरे मराठी माणसांसाठी राखीव ठेवावीत, यासाठी राज्य सरकार कायदा करणार का? असा प्रश्न परब यांनी विचारला. या प्रश्नावर उत्तर देताना शंभूराज देसाई म्हणाले की, मुंबईत मराठी माणसाला सन्मान मिळावा, ही जशी तुमची भावना आहे तीच आमचीही भावना आहे. परंतु, २०१९ ते २०२२ या काळात तुमचे सरकार असताना हा कायदा का केला नाही? तुमच्या सरकारने मराठी माणसाकडे दुर्लक्ष केले, असे देसाई म्हणाले.

मात्र, यानंतर अनिल परब यांचा चांगलाच पारा चढला आणि त्यांनी शंभूराज देसाई यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. आमच्या सरकारमध्ये तुम्हीही मंत्री होता, मग तुम्ही तेव्हा काय करत होता? तुम्ही जेव्हा सरकारमध्ये होता, तेव्हा गद्दारी कशी करायची हे ठरवत होता, असे परब म्हणाले. परब यांनी गद्दार शब्दाचा उल्लेख केल्याने शंभूराज देसाई प्रचंड संतापले. तू गद्दार कोणाला बोलतो. तू बूट चाटत होता. बाहेर ये तुला दाखवतो, अशी धमकी त्यांनी परब यांना दिली. यावरून सभागृहात एकच गोंधळ सुरु झाला. त्यामुळे नीलम गोऱ्हे यांनी सभागृहाचे कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब केले.

## सार्वजनिक गणेशोत्सव आता 'महाराष्ट्र राज्य महोत्सव' आशिष शेलार यांची विधानसभेत घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

१०० वर्षांहून अधिक मोठी परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला महाराष्ट्र राज्य महोत्सव म्हणून घोषित करण्यात आले. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी ही घोषणा विधानसभेत केली. विधानसभेत निवेदन करताना मंत्री आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव १८९३ साली लोकमान्य टिळकांनी सुरू केला, या उत्सवाची पार्श्वभूमी ही सामाजिक, राष्ट्रीय, स्वतंत्रता, स्वाभिमान, स्वभाषा या सगळ्यांशी संबंधित आहे.



त्या पद्धतीनेच आज चालू आहे. महाराष्ट्राचा गौरव आणि अभिमान असावा असलेला आपला गणेशोत्सव आहे.

देशात नाहीतर जगात या गणेशोत्सवाची व्याप्ती, संस्कृती आणि प्रचार याबद्दल महाराष्ट्र सरकार कटिबद्ध राहील. काही लोकांनी वेगवेगळ्या कारणाने गणेशोत्सवाच्या सार्वजनिक परंपरेला कुठे ना कुठे परंपरागत गणेशोत्सव बाधा निर्माण करण्याचा प्रयत्न विविध न्यायालयात जरूर केला. पण या ठिकाणी मुद्दाम उल्लेख करायचा आहे की, हे महायुतीचे सरकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात या सगळ्या निर्बंधांना, आलेल्या स्पिड ब्रेकरला बाजूला करण्याचे काम अतिशय शीघ्रतेने केले, असे आशिष शेलार यांनी सांगितले.

पीओपीच्या परंपरागत मूर्तींवर बंदी आणताना सीपीसीबीच्या गाइडलाइन्सचा तत्कालीन सरकारच्या काळातल्या सरकारने बाऊ केला गेला. त्यानंतर पीओपी मूर्तींबाबतीमध्ये पर्यावरणपूरक अन्य पर्यायांना समोर ठेवून, पीओपी पर्यावरणाला घातक आहे की नाही, या विषयावर सखोल अभ्यास करण्याची भूमिका आमच्या विभागाने घेतली. राजीव गांधी विज्ञान आयोगामार्फत काकोडकर समितीचा अहवाल घेतला. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादवजी यांनी संमती दिली आणि जे निर्बंध होते तेही बाजूला निघाले. न्यायालयाच्या निवाड्यानुसार पीओपी मूर्ती बनवणे, डिस्प्ले करणे आणि विकणे यालाही परवानगी मिळाली.


आपल्या गणेशोत्सवाच्या बाबतीत महायुती सरकारने भूमिका घेतली असून, पोलीस सुरक्षा असेल, आवश्यक इन्फ्रास्ट्रक्चरवरचा खर्च असेल. कसबामध्ये आणि विशेषता पुण्यातला महोत्सव असेल मुंबईतला असेल, पूर्ण राज्यातला असेल त्यासाठी लागतील तेवढा निधी राज्य सरकार खर्च करेल. कारण गणेशोत्सव उत्साहाने साजरा करणे ही महायुतीची आणि या शासनाची भूमिका आहे. सर्व गणेशोत्सव मंडळांना यानिमित्ताने माझी विनंती आहे की, आपण जे वेगवेगळे देखावे करतात त्यामध्ये आपले सैन्य, सैनिक, सामाजिक उपक्रम, ऑपरेशन सिंदूर, देशांतर्गत विकासाची कामे, आपले महापुरुष अशा सगळ्या गोष्टींच्या विचार करावा. सामाजिक भान, पर्यावरणपूरक आणि उत्साहात साजरा होणारा हा गणेशोत्सव हा महाराष्ट्र राज्याचा महोत्सव म्हणून घोषित करताना आम्हाला आनंद होतो आहे, असे निवेदन त्यांनी केले.

## '७५ वर्षांनंतर इतरांना संधी दिली पाहिजे', आरएसएस प्रमुख मोहन भागवतांचे सूचक विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नागपूर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत निवृत्ती वयाबाबत एक मोठे विधान केले आहे. बुधवारी (९ जुलै २०२५) नागपूर येथील वनमती हॉलमध्ये एका कार्यक्रमा बोलताना ते म्हणाले की, ७५ वर्षांनंतर व्यक्तीने इतरांना संधी दिली पाहिजे. त्यांच्या या वक्तव्याचे वेगवेगळे अर्थ लावले जात आहेत.

सरसंघचालकांनी संघाचे वरिष्ठ अधिकारी मोरोपंत पिंगळे यांचे त्यांच्या जीवनावर आधारित एका इंग्रजी पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात स्मरण केले. यावेळी त्यांनी सांगितले की, वृंदावनमध्ये झालेल्या संघाच्या बैठकीत मोरोपंत पिंगळे यांच्या ७५ व्या वर्षाबद्दल त्यांचा सन्मान करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी तत्कालीन सरकार्यवाह शेषाद्री यांनी मोरोपंतांना शाल घालून सन्मानित केले. त्यावेळी मोरोपंत म्हणाले होते की, मला ७५ चा अर्थ समजतो.



मोरोपंतांची आठवत काढत भागवत म्हणाले की, ही त्यांची एक शिकवण आहे. मोरोपंत पिंगळे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात कोणत्याही प्रसिद्धीशिवाय काम करण्याची आणि पंच्याहत्तर वर्षांनी निवृत्त होण्याची शिकवण दिली होती. आणीबाणीनंतरच्या राजकीय बदलांदरम्यान आरएसएस प्रमुखांनी पिंगळे यांच्या भाकित्यांचा उल्लेख केला आणि सांगितले की, जेव्हा निवडणुकांवर चर्चा झाली, तेव्हा मोरोपंत म्हणाले होते की, जर सर्व विरोधी पक्ष एकत्र आले, तर ते सुमारे २७६ जागा जिंकतील. जेव्हा निकाल आले, तेव्हा २७६ जागा जिंकल्या गेल्या होत्या. निकाल जाहीर झाले, तेव्हा मोरोपंत सातारा जिल्ह्यातील सज्जनगड किल्ल्यावर सर्व माध्यमांपासून दूर होते. मोरोपंतांनी राम जन्मभूमी चळवळीतही अशोक सिंघल यांना पुढे ठेवले होते. ते स्वतः कधीही पुढे गेले नाहीत. त्यांनी त्यांच्या आचरणातून प्रसिद्धीपासून दूर राहून काम करण्याचे उदाहरण ठेवले. त्यांनी लहानपणापासूनच आत्मत्यागाची कठोर साधना केली होती. ते संघासाठी खूप समर्पित होते.

## साई चरणी ६५ लाख रुपयांचे सोने चांदीचे दान

### गुरुपौर्णिमेनिमित्त भाविकांची साई दरबारी अलोट गर्दी : आज साई मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुले राहणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० पुणे**

शिर्डीत आज गुरुपौर्णिमेचा मोठा उत्साह दिसून येत आहे. सकाळपासूनच साईभक्तांनी उत्सवानिमित्त दर्शनासाठी मोठी गर्दी केली आहे. आलेले भाविक साईचरणी मोठ्या प्रमाणात दान करत असून आजच्या गुरुपौर्णिमेनिमित्ताने साईबाबांच्या चरणी ६५ लाख रुपयांचे सोने आणि चांदीचे दान करण्यात आले आहे. अजून देखील दान करणाऱ्यांचा ओघ सुरूच आहे.

शिर्डीच्या साई मंदिरात साजरा केल्या जाणाऱ्या तीन दिवसीय गुरुपौर्णिमा उत्सवाचा आज मुख्य दिवस आहे. यामुळे आज सकाळपासून साई समाधीसह गुरुस्थान मंदिराच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. साईबाबांना गुरुस्थानी मानून दरवर्षी लाखो साई भक्त शिर्डीत दर्शनासाठी



येत असतात. आज देखील सकाळपासूनच भाविकांचा मोठा उत्साह दिसून येत आहे. आज साई मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुले राहणार आहे.

### ५९ लाख रुपयांचा सोन्याचा मुकुट अर्पण

गुरुपौर्णिला दानशूर भाविकांकडून साईबाबांच्या चरणी गुरुदक्षिणा म्हणून मोठ्या प्रमाणात दान करण्यात येत असते. त्यानुसार सकाळपासून भाविकांकडून मौल्यवान वस्तूंचे दान करणे सुरु आहे. त्यानुसार साई चरणी आतापर्यंत ६५ लाख रुपयांचे सोने चांदीचे दान आले आहे. यात ५९ लाख रुपये किमतीचा सोन्याचा मुकुट, ३ लाख रुपये किमतीचे सोन्याचे फुल आणि २ लाख ८० हजार रुपये किमतीचा चांदीचा हार अर्पण करण्यात आला आहे.

## निवडणुकीआधीच मविआ फुटणार? संजय राऊतांच्या वक्तव्याने मोठी उलथापालथ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मुंबई**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रतीक्षा आता लवकरच संपणार आहे. गेल्या काही वर्षांपासून रखडलेल्या या निवडणुकांच्या तारखा येत्या काही दिवसात जाहीर होण्याची शक्यता आहे. या संदर्भात शिवसेना उबाठा गटाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी पत्रकारपरिषदेत मोठं वक्तव्य केलं आहे. स्वराज्य स्थानिक संस्थांच्या निवडणूका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) आणि मनसेने एकत्ररित्या लढाव्यात असा लोकांचा दबाव असल्याचं राऊत यांनी म्हटले आहे. यावेळी त्यांनी माध्यमांशी बोलताना महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीबाबतही भाष्य केले.



विधानसभेला महाविकास आघाडी स्थापन झाली. आणि त्यात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि काँग्रेस पक्ष ही महाराष्ट्र विधानसभेसाठी निर्माण झालेली आघाडी होती. आजही महाविकास आघाडी असून कुणीही यातून बाहेर पडलेलं नाही. आम्ही एकत्र निवडणुका लढलो. आम्ही आजही त्याचे घटक आहोत. आजही महाविकास आघाडी संदर्भात निर्णय एकत्र घेतले जातात. आता विषय राहतो महानगरपालिकांचा त्यासंदर्भात आजही लोकांच्या मनात प्रश्न आहेत की, मविआ किंवा इंडिया आघाडी या स्थानिक स्वराज्य संस्था एकत्र लढतील का? पण त्यासाठी त्यांची स्थापना झालेली नाही.

## संपादकीय ......

# शाश्वत, अनंत गुरुतत्त्व

*वैदिक तत्त्वज्ञानाला सुव्यवस्थित रूप देणारे महर्षी वेदव्यास यांचा जन्मदिवस म्हणजे गुरुपौर्णिमा. 'आदिगुरू' भगवान दत्तात्रेयांपासून ते सर्व गुरूंचे स्मरण, पूजन करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा. त्यानिमित्त...*

*सर्वव्यापी, शाश्वत आत्मतत्त्व म्हणजेच गुरुतत्त्व. आत्मा आणि सर्वव्यापी ब्रह्म एकच आहे. तेच बाह्यरूपात सद्गुरू रूपाने व अंतर्यामी आत्मस्वरूपाने विलसत असते. सद्गुरू शिष्याला सगुण रूपात उपदेश करतातच; पण काही प्रसंगी हे गुरुतत्त्व अन्यही प्रकारे सत्पात्र शिष्याला ज्ञानोपदेश करीत असते. याबाबत उपनिषदांमध्ये अनेक उदाहरणे आहेत. वेदकालीन परंपरेतील गुरू-शिष्य संबंधांमधील एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि परिणामकारक घटना म्हणजे, महर्षी याज्ञवल्क्य आणि त्यांचे गुरू वैशंपायन यांच्यातील वाद. हा वाद केवळ दोन व्यक्तींपुरता मर्यादित नव्हता, तर यामुळे यजुर्वेदाच्या दोन प्रमुख शाखा निर्माण झाल्या, ज्या आजही प्रचलित आहेत. महर्षी वैशंपायन हे महर्षी वेदव्यास यांचे प्रमुख शिष्य होते. राजा जनमेजय याला महाभारताची कथा सांगणारे मूळ निवेदक वैशंपायनच होते. महर्षी याज्ञवल्क्य हे वैशंपायन यांचे भाचे आणि अत्यंत हुशार व तेजस्वी शिष्य होते. या गुरू-शिष्यांमधील वादाची सुरुवात एका घटनेमुळे झाली.*

*एकदा सर्व ऋषींनी मिळून मेरू पर्वतावर एका सभेचे आयोजन केले. या सभेसाठी एक नियम होता की, जो कोणी ऋषी या सभेला उपस्थित राहणार नाही, त्याला ब्रह्महत्येचे पाप लागेल. काही कारणास्तव महर्षी वैशंपायन त्या सभेला उपस्थित राहू शकले नाहीत. त्यामुळे नियमानुसार त्यांना ब्रह्महत्येचे प्रायश्चित्त करणे भाग होते. वैशंपायन यांनी आपल्या सर्व शिष्यांना बोलावून सांगितले की, 'माझ्यावरील हे पाप दूर करण्यासाठी तुम्ही सर्वांनी मिळून तपश्चर्या करा.' यावेळी आपल्या सामर्थ्याचा आणि ज्ञानाचा अभिमान असलेले याज्ञवल्क्य म्हणाले, 'गुरुदेव! हे सर्वसामान्य शिष्य काय तप करणार? या सर्वांच्या वतीने मी एकटाच हे प्रायश्चित्त पूर्ण करतो.' याज्ञवल्क्यांचे हे बोलणे वैशंपायन यांना आपला आणि इतर शिष्यांचा अपमान वाटला. क्रोधित होऊन ते म्हणाले, 'तू माझ्या इतर शिष्यांचा अपमान करत आहेस. तुझ्यासारख्या अहंकारी शिष्याची मला गरज नाही.तू माझ्याकडून जे काही ज्ञान (यजुर्वेद) घेतले आहेस, ते सर्व मला परत कर.' गुरूची आज्ञा शिरोधार्य मानून याज्ञवल्क्यांनी योगसामर्थ्याने आपल्याकडून शिकलेला संपूर्ण यजुर्वेद ओकून टाकला (वमन केला). याज्ञवल्क्यांनी वमन केलेल्या त्या ज्ञानरूपी अन्नाला (वेदमंत्रांना) वैशंपायन यांच्या इतर शिष्यांनी तित्तिर पक्ष्यांचे रूप घेऊन ग्रहण केले. वमन केल्यामुळे ते ज्ञान काहीसे अस्पष्ट किंवा 'कृष्ण' (काळे/मिश्रित) झाले होते. तित्तिर पक्ष्यांनी ग्रहण केल्यामुळे या शाखेला 'तैत्तिरीय संहिता' असे नाव मिळाले आणि तिच्या मिश्र स्वरूपामुळे तिला 'कृष्ण यजुर्वेद' म्हटले गेले. आपले सर्व ज्ञान परत केल्यानंतर याज्ञवल्क्य ज्ञानहीन झाले. मग, त्यांनी कठोर तपश्चर्या करून सूर्यदेवाची आराधना केली. त्यांच्या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन सूर्यदेवाने त्यांना घोड्याच्या (वाज) रूपात दर्शन दिले आणि एका नवीन, शुद्ध आणि सुव्यवस्थित यजुर्वेदाचे ज्ञान दिले. सूर्याकडून मिळाल्यामुळे हे ज्ञान अत्यंत तेजस्वी आणि 'शुक्ल' (पांढरे/शुद्ध) होते. म्हणूनच या शाखेला 'शुक्ल यजुर्वेद' असे म्हटले जाते. या कथेत सर्वव्यापी गुरुतत्त्वाने सूर्यरूपातून याज्ञवल्क्यांना ज्ञान दिल्याचे दिसते.*

*गुरुपौर्णिमेनिमित्त साकार सद्गुरू रूपातील आणि अशा अनंत, सर्वव्यापी स्वरूपातील गुरुतत्त्वास शतशः*

# आदिवासींची घरे संरक्षणासाठी नियमितीकरण

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०मुंबई,** - राज्यातील आदिवासी बांधवांच्या घरांना संरक्षण देण्यासाठी शासन वचनबद्ध असून, यासाठी आवश्यक त्या सर्व कायदेशीर पर्यायांचा विचार करून तातडीने नियमितीकरणाची प्रक्रिया राबवली जाईल, असे स्पष्ट आश्वासन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधान परिषदेत दिले.विधान परिषदेत आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, १९५० ते १९५३ या कालखंडात काही जमिनींच्या सातबारावर बारगड जहागीरदार अशी नोंद आहे. सदर जमिनींवर अनेक आदिवासी कुटुंबे दीर्घकाळपासून वास्तव्यास असून, त्यांना घरे बांधण्यासाठी जहागीरदारांकडून एनओसी घ्यावी लागत होती. काही प्रकरणांमध्ये जाहागीरदारांकडून परवानगीसाठी पैसे मागितल्याच्या तक्रारीही शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत.या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल असलेल्या प्रकरणात जहागीरदारांचे हक्क कायम ठेवले गेले आहेत. मात्र, या पार्श्वभूमीवरशासनाने पुढील तीन पर्यायांचा गांभीर्याने विचार सुरू केला आहे:महाराष्ट्र कुळ कायदा व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील कलम १८ आणि १९ नुसार,




अनुसूचित जमातीच्या कुटुंबांनी शासकीय किंवा वादग्रस्त जमिनीवर वास्तव्य केले असल्यास, त्या घरांना कायदेशीर मान्यता देता येईल का, याचा विचार सुरू आहे.उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात रिव्ह्यू पिटीशन दाखल करण्याचा किंवा सर्वोच्च न्यायालयात एसएलपी दाखल करण्याचाही शासन विचार करत आहे. जवळपास ७५ वर्षांपूर्वी झालेले हे अतिक्रमण असल्याने, महाराष्ट्र महसूल जमिन अधिनियमानुसार त्याचे नियमबद्ध रूप देणे शक्य आहे का, हेदेखील शासन पाहत आहे.बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, या आदिवासी बांधवांना न्याय मिळवून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. त्यामुळे याबाबत उच्चस्तरीय बैठक घेऊन सर्व पर्यायांचा वापर करत नियमितीकरणाच्या प्रक्रियेला गती देण्यात येईल आणि आदिवासी घरांना संरक्षण दिले जाईल.

# ग्रामपंचायतमधील कर्मचाऱ्यांनी केली परस्पर भंगारविक्री

## दोन कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्याची सदस्यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० नांदगाव पेठ** येथील ग्रामपंचायमध्ये दोन कर्मचार्यांनी मोठ्या प्रमाणात भंगार साहित्य परस्पर विक्री केल्याचा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे ही विक्री ग्रामपंचायतीची कोणतीही मंजुरी न घेता केली गेली आहे. यामध्ये ग्रामपंचायत कर्मचारी गोपाल शेळके व रविंद्र भोपळे यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले असून त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी सदस्यांनी केली आहे. या प्रकरणात सरपंच, उपसरपंच आणि सचिव यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप ग्रामपंचायत सदस्यांनी केला आहे. २५ जून २०२५ रोजी पार पडलेल्या मासिक सभेमध्ये काही सदस्यांच्या नावाने खोटा ठराव मंजूर करण्यात आल्याचा आरोप निवेदनकर्ते सदस्यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या तक्रारीत केलेला आहे. यामार्फत संबंधित कर्मचाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. सदस्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, ग्रामपंचायतीतील जुने खुर्च्या, ट्युबलाईट नळ्या, वायर, पाईप्स, कुलर आणि अन्य भंगार साहित्य हे कोणतीही लेखी परवानगी किंवा ठराव न घेता परस्पर विकण्यात आले. या प्रकाराची ०४ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयानुसार सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी तसेच कथित चोरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या सरपंच, सचिव व उपसरपंच यांच्यावर सुद्धा कार्यवाही करावी अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य साहेबराव उर्फ छत्रपती पटके,बलविर चव्हाण,किशोर नागापूरे, शिवराजसिंह राठोड, वृषाली इंगळे, आशा चंदेल,वंदना भटकर, उर्मिला गायगोले,मंदा कापडे,तंटामुक्त समिती अध्यक्ष संजय चौधरी यांनी केली आहे.




## साधं मीठ सोडून रोज हिमालयन पिंक सॉल्ट खाता का?वेळीच व्हा सावध, शरीरात होऊ शकतात या समस्या...

**दि.१० विदर्भ प्रजासत्ताक**

मीठ केवळ पदार्थांची टेस्ट वाढवत नाही तर आरोग्यालाही अनेक फायदे देतं. आधी सगळे लोक एकाच प्रकारचं मीठ वापरत होते. पण तेच नेहमीच मीठ न वापरता अलिकडे लोक वेगवेगळ्या प्रकारचे मीठ वापरत आहेत. बरेच लोक हिमालयन सॉल्टचा वापर करत आहेत. पण याचा वापर करत असताना याचे आरोग्याला फायदे होतात की नाही याचा विचारही केला जात नाही. केवळ कुणी सांगितलं म्हणून लोक याचा आहारात समावेश करतात. तुम्ही सुद्धा नेहमीच मीठ सोडून जरा सावध होण्याची गरज आहे. कारण नॅचरल मिनरल्स आणि डिटॉक्सचे भरपूर गुण असूनही हे मीठ शरीरात आयोडिनची कमतरता करू शकतं. डॉक्टरांनी हे मीठ खाण्याबाबत काही इशारे दिले आहेत.




**हिमालयन पिंक सॉल्ट काय आहे?**

हिमालयन पिंक सॉल्टला सैंधव मीठ असंही म्हटलं जातं. हे मीठ दिसायला गुलाबी असतं. यात कॅल्शिअम, आयर्न, पोटॅशिअम आणि मॅग्नेशिअमचं प्रमाण कमी असतं. नेहमीच्या मिठापेक्षा यात कमी सोडिअम असतं. या मिठाची टेस्ट खारट कमी आणि गोड जास्त असते. केक आणि कुकीज बनवण्यासाठी या मिठाचा वापर केला जातो.

**साधं मीठ आणि पिंक सॉल्टमध्ये फरक**

टेबल सॉल्ट म्हणजे साध्या मिठात आयोडिन अनेकदा मिक्स केलं जातं. तर हिमालयन पिंक सॉल्टमध्ये नॅचरली आयोडिन नसतं.

टेबल सॉल्टमध्ये मिनरल्स कमी असतात, पण पिंक सॉल्टमध्ये ८० पेक्षा जास्त ट्रेस मिनरल्स असतात, पण यांचं प्रमाण खूप कमी असतं.

टेबल सॉल्टमध्ये खारटपणा जास्त असतो, तर पिंक सॉल्टमध्ये कमी असतो.

थायरॉइडसारख्या आजारांपासून बचाव करण्यासाठी टेबल सॉल्ट फायदेशीर ठरतं. तर हिमालयन सॉल्ट यात कमी पडतं.

अनेक एक्सपर्ट्स सांगतात की, हिमालयन सॉल्ट, रिफाइंड टेबल सॉल्टच्या तुलनेत काही बाबतीत अधिक चांगलं ठरू शकतं. पण आहारातून टेबल सॉल्ट पूर्णपणे बाजूला करून हिमालयन सॉल्ट खात असाल तर आयोडिन कमी होण्याचा धोका वाढू शकतो.

# सोयाबीन पेरणी किती तारखेपर्यंत करू शकतो अन् कशी करावी? वाचा सविस्तर

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

राज्यातील बहुतांश जिल्ह्यात समाधानकारक पाऊस झाला आहे. पावसाचा अंदाज लक्षात घेता वापशावर (६५ ते १०० मी.मी. पाऊस) बीजप्रक्रिया करून सोयाबीन पिकाची पेरणी जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पूर्ण करावी. कारण पेरणी जसजशी उशिरा होत जाईल, त्यप्रमाणे उत्पादनात मोठी घट होते.

पेरणीचे अंतर दोन ओळीत ४५ सें.मी. व दोन रोपातील अंतर ५ सें.मी. अशा प्रकारे करावे. पेरणी करताना बियाणे ४ सें. मी. पेक्षा खोल पडणार नाही, याची काळजी घ्यावी. तज्ञांच्या मतानुसार साधारण १५ जुलैपर्यंत पेरणी करून घ्यावी. अधिकचा उशीर होणार नाही याची काळजी घ्यावी.

**आंतरपीक पद्धती**

मध्यम ते भारी जमिनीत सोयाबीन आणि तूर या पिकांच्या ओळींचे प्रमाण ३:१ किंवा ४:२ असे ठेवावे. उशिरा पेरणीसाठी सुद्धा ही पद्धत उपयुक्त व फायदेशीर आहे. सर्वसाधारणपणे या आंतरपीक पद्धतीपासून निव्वळ तुरीच्या तुलनेत प्रति एकर अधिक उत्पन्न मिळते.

या गोष्टीही लक्षात असू द्या

पेरणीच्या वेळी जमिनीमध्ये ओलावा असावा.

एका एकरासाठी साधारणपणे ३० ते ४० किलो बियाणे पुरेसे असते.

सोयाबीनचे बियाणे जास्त खोलवर पेरू नये, ज्यामुळे उगवण चांगली होईल.

पेरणीनंतर तणांचे नियंत्रण करणे आवश्यक आहे.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# भाजप मेळघाट जिल्हा अमरावती ग्रामीणचे ३ पदाधिकारी राज्य परिषदेवर

## अचलपुर तालुक्यातील दोघांचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अचलपुर**

भारतीय जनता पार्टीच्या पक्षांतर्गत रचनेनुसार जेष्ठ पदाधिकाऱ्यांना राज्य परिषदेवर पाठवण्यात आले असून मेळघाट जिल्हा अमरावती ग्रामीण येथील तीन पदाधिकाऱ्यांचा यात समावेश करण्यात आला आहे.

भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष सुधीर रसे, पथ्रोट, जिल्हा कार्यकारणी सदस्य अभय माथने अचलपुर तसेच दर्यापूर येथील पदाधिकारी गोपाल चंदन यांची राज्य परिषदेवर निवड करण्यात आली असून ते २०२५ ते २०१८ या कालावधी भाजपा राज्य परिषद सदस्य राहतील हे तीनही पदाधिकारी गेल्या दोन-तीन दशकापासून भारतीय जनता पक्षात एक निष्ठेने कार्य करत असुन त्यांनी पक्ष मजबुतीला व वाढीला नेहमी प्राधान्य दिल्याने त्यांचे कार्य बघून त्यांना परिषदेवर निवड करण्यात आली आहे त्यांनी या निवडीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाध्यक्ष मेळघाट प्रभूदास भिलावेकर यांचे आभार मानले असून पक्षाने दिलेल्या जबाबदारीत शंभर टक्के खरे उतरू असा विश्वास व्यक्त केला आहे. त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.



# रोजगार हमीची देयके वेळेत अदा करावीत-जिल्हाधिकारी येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती,**

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत विविध कामे करण्यात येतात. यातील देयक अदा करण्याची कार्यवाही समाधानकारक नाही. कामांची देयके सात दिवसांच्या आत अदा करण्यासाठी तालुकास्तरीय यंत्रणांनी कार्यवाही करावी. येत्या काळात रोजगार हमीची देयके वेळेत अदा करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात मनरेगा अंतर्गत सर्व यंत्रणांची कामकाजविषयक आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, उपवनसंरक्षक धैर्यशिल पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक कासोदे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले, मनरेगामध्ये मस्टर दिल्यानंतर रोजगार सेवकांकडून सात दिवसांच्या आत मस्टर जमा करण्यात यावे. यासाठी रोजगार सेवकांची तालुकास्तरावर बैठक घेण्यात यावी. यात मस्टर जमा करण्यासाठी समन्वय साधण्यात यावा. प्राप्त झालेली मस्टर अपलोड करण्याची कार्यवाही तातडीने करावी. सात दिवसांचे देयक तातडीने अदा करण्यासाठी कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच देयक जमा करण्यासाठी आधारबाबत येणाऱ्या अडचणी तातडीने



सोडविण्यात याव्यात. सध्या मनरेगा अंतर्गत घरकुलांचे काम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे ही कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा.मनरेगामध्ये अकुशलचा निधी प्राप्त होत आहे. मात्र कुशलचा निधी प्राप्त होण्यास वेळ लागत आहे. कुशलचा निधी प्राप्त झाल्यानंतर कामे पूर्ण करून त्याचा अहवाल तातडीने देण्यात यावा. सध्या पावसाळा सुरू असल्याने मनरेगा अंतर्गत गाळ काढणे, रस्त्याची कामे घेऊ नये. विविध यंत्रणांनी केलेली कामे तपासण्यात येत आहे. केवळ कुशलच्या निधीअभावी कामे राहणे अपेक्षित आहे. काही यंत्रणांची गेल्या कालावधीचीही कामे पूर्ण झालेली नाही, ही कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. यावेळी वन, कृषी, सामाजिक वनीकरण आदी यंत्रणांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला.-

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा
विदर्भ प्रजासत्ताक
गुरुवार दि. १० जुलै २०२५
शहर/ग्रामिण

# ‘कृषी’मधील बड्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची टांगती तलवार

## अमरावतीचे जेडीए, चंद्रपूर, वर्धाचे एसएओंचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

सेवानिवृत्तीला अवघे २२ दिवस बाकी असताना अमरावतीचे विभागीय कृषी सहसंचालक (जेडीए) प्रमोद लहाळे यांच्या नागपूर विभागात चंद्रपूर येथे नियमित व वर्धा जिल्ह्याचे प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार यांच्या पदोन्नतीपूर्वी अडचणी वाढल्या आहेत. या अधिकाऱ्यांविरोधात आ. धस यांनी वेळोवेळी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कारवाईचे प्रस्ताव शासनाने मागितले आहे.विशेष म्हणजे याबाबत आयुक्तांना दिलेले पत्र ३ जुलैचे असताना ८ तारखेपर्यंत रोखून ठेवण्यात आले होते. या



### काय आहे पत्रात?

विभागीय कृषी सहसंचालक अमरावती, प्रमोद कसनदास लहाळे व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी चंद्रपूर, शंकर तोटावार यांची चौकशी होईतोवर त्यांना निलंबित करण्याची विनंती आ. धस यांनी केली आहे. या प्रकरणाची शहानिशा करून तत्काळ कार्यवाही करण्यात यावी तसेच आवश्यकतेनुसार परिपूर्ण प्रस्ताव शासनाला विनाविलंब सादर करावा, असे कृषी आयुक्तांना दिलेल्या पत्रात नमूद आहे.

अनुषंगाने कृषिमंत्री व प्रधान सचिव (कृषी) यांच्याशी मंगळवारी यांच्याकडे याविषयी तक्रार केल्यानंतर सत्यता बाहेर आली व मंगळवार ८ जुलै रोजी हे पत्र कृषी आयुक्त पुणे यांना



जेडीए लहाळे व एसएओ तोटावार यांना निलंबित करून त्यांच्या गैरकारभाराची वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यामार्फत चौकशी करावी व या दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत. त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांना सहआरोपी करण्याची मागणी शासनाकडे केली. **– सुरेश धस, आमदार**

देण्यात आल्याची माहिती आ. धस यांनी दिली. या दोन्ही अधिकाऱ्यांची अनियमितता, भ्रटाचार याबाबत आ. धस यांनी शासनाकडे सातत्याने तक्रार व त्या अनुषंगाने पाठपुरावा केला आहे. त्यावर राज्याच्या कृषी आयुक्तांनी चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करून १५ दिवसांत अहवाल मागितला होता. मात्र, हे दोन्ही अधिकारी पदावर असताना निष्पक्ष चौकशी होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने निलंबित करण्याची मागणी आ. धस यांनी कृषी सचिव विकासचंद्र रस्तोगी यांच्याकडे लावून धरली होती व त्या अनुषंगाने ८ जुलै रोजी याबाबत पत्र दिले असता त्यावर प्रधान कृषी सचिवांनी या दोन्ही अधिकाऱ्यांबाबत प्रस्ताव मागितल्याचे आ. धस यांनी सांगितले.

# अचलपुर ते सावळी डांबरी रस्ता झाला बेपत्ता

## नामदार गंज भागात डांबर गायब

### प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेतुन बनला रस्ता, चौकशी करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अचलपूर**

प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेअंतर्गत गेल्या वर्षी अचलपूर ते सावळी दातुरा या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्यात आले होते . तब्बल दोन वर्षे हा रस्ता बनविन्यात च गेले . मात्र एका वर्षातच रस्त्याची वाट लागली असून रस्त्यावर डांबर टाकले की नाही अशी परिस्थिती झाली असून अचलपूर शहरातील नामदारगंज भागात या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून या रस्त्याच्या कामाची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे . पंतप्रधान मंत्री ग्रामीण सडक योजना अंतर्गत अचलपूर ते सावळी दातुरा या गावादरम्यान दोन वर्षे आधी डांबरी रस्ता करण्यात आला होता . गेल्या आठ दिवसापासून सुरू असलेल्या भुरभुर पावसाने या रस्त्याची पार वाट लागली आहे रस्त्यावरील डांबर पूर्णतः गायब झाले असून रस्त्यावर काळ्या मातीचे थर व चिखल साचला आहे . वाहने तर दूरच पायी चालणेही या रस्त्याने मुश्किल झाले आहे . अचलपूर शहरातील नामदार गंज भागातील नगर परिषद प्राथमिक मराठी शाळे पासून हा रस्ता सुरु होऊन बैतुल अकोला अंतरराज्य महामार्गाला जोडल्या गेला आहे त्यामुळे या रस्त्यावरून वाहतूक देखील वाढली आहे . परंतु या रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार



एवढा झाला की सदर रस्त्यातील डांबर गायब झाले असून डांबराच्या जागी रस्त्यावर माती , चिखल साचला आहे . नामदार गंज , अलकरीम कॉलणी व नव्या तिन चार वसाहती देखील या रस्त्या च्या कडेला झाल्या असून त्या ठिकान च्या नागरीका चे घरा बाहेर निघनेही कठीन झाले आहे . मुख्यमंत्री सडक योजना व नंतर पंधानमंत्री सडक योजने अंतर्गत हा रस्ता बनला असून कोटयावधी निधी देखील या मार्गावर माजी खासदार यांनी टाकला होता परंतु आज या रस्त्याची एकाच वर्षात दुरावस्त झाली असुन या रस्त्याच्या कामाची चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# बालगृह ‘वझ्झर मॉडेल’ म्हणून घोषित करण्यासाठी प्रयत्न- जिल्हाधिकारी आशिष येरेकर

## जिल्हाधिकाऱ्यांची वझ्झर बालगृहाला भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती,-** जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज वझ्झर फाटा, ता. अचलपूर येथील स्व. अंबादास पंत वैद्य मतिमंद व मूकबधिर बालगृहाला भेट दिली. यावेळी त्यांनी पद्मश्री डॉ. शंकरबाबा पापळकर यांच्यासोबत एक तास चर्चा केली. यावेळी त्यांनी बालगृहाला वझ्झर मॉडेल म्हणून घोषित करण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत चर्चा केली. भेटीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण बालगृहाची पाहणी केली. त्यानंतर मतिमंद व मूकबधिर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. परिसरात विद्यार्थ्यांनी लावलेल्या झाडांचीही पाहणी केली. संस्थेचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. शंकरबाबा पापळकर यांच्यासोबत त्यांनी विविध विषयांवर चर्चा केली. चर्चेदरम्यान बालगृहाशी संबंधित महत्त्वाचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याबाबत विनंती करण्यात आली. यामध्ये बालगृहाला ’वझ्झर मॉडेल’ म्हणून घोषित करणे, विद्यार्थ्यांचे मानधन पाच हजार रूपयांपर्यंत वाढवणे, विद्यार्थ्यांना आजीवन बालगृहात ठेवण्याची परवानगी देणे आणि वझ्झर मॉडेल विभागीय स्तरावर सुरू करणे, याबाबींचा समावेश आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी सदर प्रस्ताव शासनास सादर करण्याचे आश्वासन दिले. यावेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी डी. एम. पुंड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सोंदळे आदी उपस्थित होते. दरम्यान जिल्हाधिकारी



येरेकर यांनी आज चांदूर बाजार तहसील कार्यालय येथे महसूलविषयक बाबीचा आढावा घेतला. महसूल विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेऊन त्यांनी सूचना केल्या. यासोबतच त्यांनी टोंगलापूर येथील रोपवाटिकेला भेट दिली.यावेळी तालुका पालक महसूल उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, प्रभारी तहसीलदार श्री. तिवारी, नायब तहसीलदार श्री. सोनारकर, तालुका कृषी अधिकारी फाल्गुनी ननीर, गटविकास अधिकारी निलेश वानखडे उपस्थित होते. बैठकीत घरकुल लाभार्थ्यांना वाळू वाटप, नैसर्गिक आपत्ती, आपले सरकार आणि पीजी पोर्टलवरील



प्राप्त तक्रारी, शेतकरी आत्महत्या, संजय गांधी योजना आणि श्रावणबाळ योजनेसाठी आधार प्रमाणीकरण, ग्रीस्टॅक याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्राम महसूल अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.यानंतर जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी टोंगलापूर येथील मनरेगा अंतर्गत तयार करण्यात आलेल्या सामाजिक वनीकरण रोपवाटिकेला भेट दिली. याठिकाणी असलेल्या कलमांची चौकशी करून माहिती घेतली. रोपे वितरीत करताना झाडावर त्यांचे नाव आणि त्यांचा उपयोगाबाबत फलक लावण्याच्या सूचना सामाजिक वनीकरण विभागास दिल्या.

अचलपूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फळभाज्या आणि इतर शेतमालाच्या संरक्षणासाठी उभारण्यात आलेल्या शीतगृहाची पाहणी जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केली. यावेळी तहसीलदार संजय गरकल, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव आणि सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागाचे कार्यकारी अभियंता रोहन पाटील उपस्थित होते.सदर शीतगृहाची साठवणूक क्षमता १० मेट्रिक टन आहे. यात फळे आणि भाज्या दीर्घकाळ टिकवून ठेवण्याची क्षमता आहे. यासाठी आवश्यक असलेली सापेक्ष आर्द्रता देखील राखली जाते. शीतगृहाच्या आत बाष्पीभवन युनिट आणि बाहेर कंडेन्सर युनिट असलेल्या ’स्प्लिट’ प्रकारच्या प्रणाली बसविण्यात आली आहेत. सदर शीतगृह १० किलोवॅट क्षमतेचे असून सौर ऊर्जेवर चालते. यामध्ये बायफेशियल सोलर पॅनेल वापरले आहेत, जे कमी प्रकाशातही वीज निर्माण करतात. शीतगृह अत्याधुनिक सेन्सर्सनी सुसज्ज आहे. हे सेन्सर्स फळे आणि भाज्यांमधून निर्माण होणारे अनावश्यक व हानिकारक वायू शोधून त्यांना शीतगृहातून बाहेर काढतात, ज्यामुळे फळे आणि भाज्या अधिक कालावधीसाठी साठवता येतात. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक सोय निर्माण झाली आहे.

# धक्कादायक....सहा महिन्यांत पश्चिम विदर्भात ५२७ शेतकरी आत्महत्या....

## अस्मानी, सुल्तानी संकटाचे बळी.... पश्चिम विदर्भात दर आठ तासांत एक शेतकरी कवटाळतो मृत्यूला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती** पश्चिम विदर्भात म्हणजेच अमरावती,यवतमाळ, वाशिम, बुलढाणा आणी आकोला या जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र वाढतेच आहे. यंदा सहा महिन्यात म्हणजेच जूनअखेर ५२७ शेतकऱ्यांनी आत्महत्या झाल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक यवतमाळ जिल्ह्यात १७८ आत्महत्या आहे. दर आठ तासात एक शेतकरी मृत्यूचा फास आवळत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.नैसर्गिक आपत्ती, नापिकी, दुष्काळ, बँकांचे व सावकारांचे कर्ज, कर्ज वसुलीचा तगादा, मुलींचे लग्न,



### सन २००१ पासून शेतकरी आत्महत्या

अमरावती जिल्हा : ५,४७७यवतमाळ जिल्हा : ६,३५१अकोला जिल्हा : ३,२०७वाशिम जिल्हा : २,१०७बुलढाणा जिल्हा : ४,५३२

राज्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या यवतमाळ जिल्ह्यात

जानेवारी ते जून पर्यंत झालेल्या आत्महत्या आकडेवारी

अमरावती जिल्हा –१०१यवतमाळ जिल्हा –१७८ अकोला जिल्हा –९०बुलढाणा जिल्हा –९१वाशिम जिल्हा –६७–

आजारपण यासह अनेक कारणांमुळे पश्चिम विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्याचे वास्तव आहे. यावर मात करण्यासाठी शासन–प्रशासन गंभीर नसल्याने शेतकऱ्यांच्या समस्या वाढलेल्या आहेत.अमरावती विभागीय आयुक्तालयाच्या अहवालानुसार जानेवारी ते जून २०२५ या सहा महिन्यांच्या कालावधित तब्बल ५२७ शेतकरी आत्महत्या झाल्या

# अंजनगावसुर्जी तालुक्यात येणार ४९ पैकी २६ ठिकाणी महिलाराज

## आरक्षणातुन अनेकांचे गणितं फसले तर काहींचे हास्य फुलले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अं.सुर्जी**

तालुक्यात येत्या कळात होणार ग्रामपंचायत निवडणुकिसाठी थेट सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम मंगळवारी (ता. ०८) येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहात पर पडला टॉवेळी तालुक्यातील ४९ ग्रामपंचायत सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीत २६ ठिकाणी महिला राज येणार असल्याचे चित्र समोर आले या सोडतीनंतर तालुक्यातील अनेक गाव पुढऱ्यांमध्ये राजकारनाचे गणितं फसले तर काहींच्या चेहऱ्यावर हास्य फुलल्याचे दिसून आले

तालुक्यातील एकूण ४९ ग्रामपंचायती मधून ११ ठिकाण अनुसूचित जाती करिता राखीव निघाले असून त्यात हिरापूर (खुला), कोते गाव (खुला), पोही (महीला), मलकापूर बु. (महीला), शेलगाव (महीला), दहीगाव खुर्द (महीला), चिंचोली शिंगणे (खुला), पिंपळगव्हाण (महीला), वनोजा (खुला), एकलारा (खुला), खिराळा (महीला)



अनुसूचित जमाती करिता हंतोडा (महीला) हीं एक ग्रामपंचायत असून नागकरिकांचा मागास प्रवर्ग मध्ये

साखरी (खुला), काळगव्हाण (खुला) अडगाव खाडे (महीला), खासपूर (महीला) कारला (खुला), टाकरखेडा मोरे (खुला) चौसाळा (महीला), सातेगाव (खुला) कमालपूर तरोडा (महीला), चिंचोली बु. (महीला), खानमपुर पांढरी (महीला) कोकर्डा (महीला), घोडसगाव (खुला) सर्वसाधारण या गटात हसनापूर पार्टी (महीला), बोराळा (महीला) निंभारी (महीला), लखाड (खुला) वरुड खु. (महीला), हिंगणी (महीला) हुसेनपूर खोडगाव (खुला), जवर्डी (खुला) चिंचोली खुर्द (खुला), मुऱ्हा बु. (महीला) भंडारज (महीला), निमखेड बाजार (खुला) विहीगाव बु. (खुला), कसबेगव्हाण (महीला) धनेगाव (खुला), हयापूर (महीला) कापूसतळणी (खुला), कुंभारगाव बु. (खुला) गावंडगाव बु. (खुला), सोनगाव (खुला) तुरखेड (खुला), लाखनवाडी (महीला) खिरगव्हाण (महीला), जवळा बु (महीला) असा समावेह आहे या आरक्षण सोडतीचे कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी राजेश्वर हांडे, तहसीलदार पुष्पा सोळंके, नायब तहसीलदार प्रकाश बबनोटे, सेहराज नदीम याचा सहभाग होता.

# चिखलदरा पंचायत समितीतील ६ कर्मचाऱ्यांचे निलंबन रद्द

## तीन महिन्यांत शिस्तभंग कारवाईचा फेरआढावा होणार, सीईओंनी घेतला निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

कर्तव्यात हयगय केल्याच्या कारणामुळे चिखलदरा पंचायत समितीतील एक ग्रामसेवक आणि पाच शिक्षक अशा सहा कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. दरम्यान आज, बुधवारी त्यांची बाजू ऐकून घेतल्यानंतर सीइओ संजीता महापात्र यांनी निलंबन आदेश मागे घेतले. परंतु शिस्तभंगासाठी नेमकी काय कारवाई करावी, याबाबतचा निर्णय येत्या तीन महिन्यात घेतला जाईल, असे सांगून या प्रकरणाची धाकधूक मात्र कायम ठेवली आहे.

चिखलदरा तालुक्यातील हिल्डाचा एक शिक्षक, एकताईचे ग्रामसेवक व दोन शिक्षक तसेच कुटीदा येथील दोन शिक्षकांचा गुन्हा गंभीर असल्यामुळे त्यांना निलंबित करण्यात आले होते. तर हतरुचे ग्रामसेवक, एकताई आणि कुटीदाच्या अंगणवाडी सेविका, हतरुच्या अंगणवाडी पर्यवेक्षिका, हतरु येथीलच केंद्रप्रमुख आणि चिखलदरा येथील शालेय पोषण आहार अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या होत्या.

दरम्यान निलंबित करण्यात आलेल्या सर्व सहाही कर्मचाऱ्यांना आज, बुधवारी लेखी स्पष्टीकरणासह जिल्हा परिषदेत बोलावण्यात आले होते. त्यानुसार सर्व पाचही शिक्षक व ग्रामसेवक हजर झाले. त्यांनी आपली बाजू सीइओंसमोर मांडली. ही बाजू ऐकूण घेतल्यानंतर सर्वांचे निलंबन मागे घेण्यात आले. त्याचवेळी पुन्हा चूक करणार नाही, या कबुलीसह त्या सर्वांना नियमित कर्तव्य बजावण्याचे आदेश देण्यात आले. दरम्यान या कर्मचाऱ्यांचे निलंबन मागे घेण्यात आले असले तरी त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांबाबत त्यांच्या वरिष्ठांकडून तीन महिन्यात अहवाल मागवण्यात आला आहे.




सहा जणांना निलंबित करतेवेळी तेवढ्याच कर्मचाऱ्यांच्या नावे 'कारणे दाखवा नोटीस' बजावण्यात आली होती. त्या कर्मचाऱ्यांकडूनही खुलासा मागवण्यात आला आहे. मेळघाटातील परिस्थितीत बदल व्हावा, यासाठी सीइओ महापात्र यांची धडपड सुरु आहे. त्याचाच एक भाग म्हणून चिखलदरा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा, दवाखाने आणि अंगणवाड्या व इतर कार्यालयांना त्यांनीयांनी दोन दिवसांपूर्वी आकस्मिक भेटी दिल्या होत्या. या भेटीदरम्यान काही जण विनापरवानगी अनुपस्थित आढळले. त्यामुळे ५ शिक्षकांसह एका ग्रामसेवकाला निलंबित तर इतर सहा कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस (शो कॉज) देण्यात आल्या आहेत.

दरम्यान एकाचवेळी तब्बल डझनभर कर्मचाऱ्यांवर निलंबन आणि 'शो कॉज'ची कुऱ्हाड कोसळल्याने चिखलदरा तालुक्यासह संपूर्ण मेळघाट क्षेत्रातील प्रशासन हादरुन गेले आहे. परिणामी बहुतेक अधिकारी-कर्मचारी वक्तशीर झाल्याचे जि.प. प्रशासनाचे निरीक्षण आहे.

# 'युवप्रवर्तक-डॉ. हेडगेवार' या नाटकाचे १३ ला सादरीकरण

## रवींद्र कोल्हे यांची माहिती, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशीष शेलार उपस्थित राहणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती** - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेच्या शताब्दी वर्षानिमित्त युवप्रवर्तक- डॉ. हेडगेवार' हे दोन अंकी नाटक रविवार, १३ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे सादर केले जाईल. या नाटकाची निर्मिती नादब्रह्म संस्था नागपूरने केली आहे. तसेच त्याचे सादरीकरण युगसंधान करणार आहे, अशी माहिती रवींद्र कोल्हे यांनी दिली. स्थानिक राजापेठ येथील श्रमिक पत्रकार भवनात बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत माहिती देताना रवींद्र कोल्हे म्हणाले की, 'युवप्रवर्तक- डॉ. हेडगेवार' या नाटकाच्या आयोजना समारंभात सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, पालकमंत्री आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखडे वर्ध्याचे अमर काळे, आमदार किरण सरनाईक, धीरज लिंगडे, संजय खोडके, रवी राणा, सुलभा खोडके, प्रताप अडसड, केवलराम काळे, प्रवीण तायडे, राजेश वानखडे, उमेश यावलकर, गजानन लवाटे हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. रविवार, १३ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजता होणाऱ्या या नाटकाची संकल्पना सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खर्गे, सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभीषण चावरे यांनी मांडली आहे. डॉ. अजय प्रधान यांनी लिहिलेल्या या नाटकाचे दिग्दर्शन नागपूरचे ज्येष्ठ कलाकार सुबोध सुर्जीकर यांनी केले आहे. शैलेश दाणी यांनी ते संगीतबद्ध केले आहे. सांस्कृतिक भवन येथे नागपूर येथील ४० कलाकार या नाटकाचे प्रस्तुती करतील. या नाटकामध्ये डॉ. हेडगेवार यांच्याजीवन चरित्रासोबतच या नाटकामध्ये त्यांना संघ स्थापनेची गरज का पडली याची माहिती मिळणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य संस्थापक डॉ. केशव हेडगेवार हे पूर्वी काँग्रेस विचारसरणीचेच होते मात्र, काँग्रेसमध्ये हिंदुत्वाला स्थान मिळत नसल्याचे बघता त्यांनी हिंदुत्वासाठी संघाची स्थापना केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव हेडगेवार यांचे कार्य, संघाचे विचार या नाटकाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवले जातील. या नाटकाला प्रवेश मोफत असेल. त्यामुळे या नाटकात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. पत्रपरिषदेत उल्हास बापोरीकर, चंद्रशेखर भोंडू दिलीप भुजाडे, अविनाश परहरकर जयंत बेलोरकर, भवानी शंकरदेव संजय शिरभाते, अतुल भारद्वाज उपस्थित होते.

# वनिता समाज संस्थेची नवीन कार्यकारिणी घोषित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती,**८वनिता समाज संस्थेच्या नवीन कार्यकारिणीची निवडणूक शनिवार ५ जुलै २०२५ रोजी घेण्यात आली. संस्थेची निवडणूक प्रक्रिया निवडणूक अधिकारी ज्योतिताई उल्हास मराठे ह्यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. माजी अध्यक्ष विजयाताई देशमुख त्यांनी पुढील तीन वर्षांकरिता डॉ. मनीषाताई काळेले यांची नवीन अध्यक्ष म्हणून निवड केली व त्याला वसुधाताई सावजी यांनी अनुमोदन दिले. या नंतर नवीन अध्यक्ष डॉ मनीषाताई काळेले यांनी आपल्या पदाधिकारी व कार्यकारणीची निवड करत उपाध्यक्ष पल्लवीताई बनसोड, पौर्णिमाताई सावदेकर, सचिव जयश्रीताई पांडे, सहसचिव हितेष्णीकल्पनाताई देशमुख, मेधाताई चिमोटे, आशाताई डोळे, वंदनाताई कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. १३१ वर्षा पासून फक्त महिलांद्वारा चालविण्यात येणारी वनिता समाज संस्थेच्या मावळत्या अध्यक्ष विजया ताई देशमुख यांनी आपल्या सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी चे आभार मानले व समाधान व्यक्त केले. डॉ मनीषा ताई काळेले यांना नवीन पदभार सोपविताना त्यांनी नवीन कार्यकारिणी ला शुभेच्छा दिल्या.नवीन अध्यक्ष डॉ मनीषा ताई काळेले यांनी सर्व सदस्य भगिनींचे आभार व्यक्त केले व आपल्या पदाधिकारी व कार्यकारिणी सोबत वनिता समाज संस्थेचे कार्य पुढे नेण्याचे मनोगत व्यक्त केले.-

# मध्यवर्ती बस स्थानकावर मनोरुग्णाचा धुमाकूळ

## ४ महिला कंडक्टरला पकडण्याचा प्रयत्न, प्रवासी महिलांचीही छेडछाड

### शर्थीच्या प्रयत्नानंतर पोलिसांनी पकडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती-** कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मध्यवर्ती बस स्थानकावर आज सकाळी एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार घडला. एका मनोरुग्ण व्यक्तीने अचानक धुमाकूळ घालत चार महिला बस कंडक्टरना मागून पकडण्याचा प्रयत्न केला. इतक्यावरच न थांबता त्याने इतर प्रवासी महिलांचीही छेडछाड केली, त्यामुळे संपूर्ण स्थानक परिसरात काही काळ भीतीचे व अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले. माहिती नुसार, मध्यवर्ती बसस्थानकावर आज सकाळी ११ वाजताच्या सुमारास एक मनोरूग्ण बसस्थानकात दाखल झाला. पोलिस चौकीच्या बाजूला थोळयावेळ रहिल्यानंतर त्या मनोरूग्णाने बसस्थानकाच्या प्लॅटफार्मवर फेरफटका मारला. परंतु, अचानक तो मनोरूग्ण आक्रमक झाला आणि त्याने बसस्थानकाच्या आतील




परिसरात प्रचंड गोंधळ सुरू केला. संबंधित व्यक्तीने कोणतीही पूर्वसूचना न देता थेट महिला कर्मचाऱ्यांच्या दिशेने धाव घेत त्यांना हात घालण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी बससाठी थांबलेल्या काही प्रवासी महिलांनाही त्याने विनयभंगासारख्या कृतीने त्रास दिला. परिसरात मोठी गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. बसस्थानकावरील सुरक्षा रक्षक व पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत संबंधित मनोरुग्णास ताब्यात घेतले आणि पुढील उपचारासाठी मानसोपचार देखरेखीखाली तज्ञांच्या पाठवले. याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी घटनेची गंभीर दखल घेत महिला कर्मचाऱ्यांना सुरक्षितता मिळावी यासाठी सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याचे आश्वासन दिले आहे. या घटनेनंतर महिला कर्मचारी आणि प्रवासी वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, बस स्थानकांवर महिला सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अनेकांनी या घटनेचा तीव्र निषेध करत यासंदर्भात तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# नागपुरचे अप्पर पोलिस अधिक्षक रमेश धुमाळ अमरावतीचे नवे डीसीपीडीसीपी



## किरिथिकांचे नाशिक शहर उपायुक्त म्हणून सुधारित आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती,** राज्याच्या गृहविभागाने काही दिवसांपूर्वी किरिथिका सी.एम यांची डीसीपी म्हणून अमरावती शहर पोलिस आयुक्तालयात बदली केली होती. परंतु, आता गृह विभागाने किरिथिका यांच्या बदलीचे सुधारित आदेश काढून त्यांची नाशिक शहरात डीसीपी म्हणून बदली केली. तर अमरावती पोलिस आयुक्तालयात नागपुर ग्रामीणचे अप्पर पोलिस अधिक्षक रमेश धुमाळ यांची बंद केली. गेल्या एक, दीड महिन्यापासून मंत्रालयात राज्यातील सर्व शासकीय विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा हंगाम सुरू आहे. अशातच काही दिवसांपूर्वी पोलिस आयुक्तालयातील डीसीपी सागर पाटील व डीसीपी कल्पना यांची इतर जिल्ह्यात बदली झाली. दोन्ही डीसीपींच्या जागी गृहमंत्रालयाने काही दिवसांपूर्वी आयपीएस किरिथिका यांची अमरावती शहर डीसीपी म्हणून बदली केल्याचे आदेश जारी केले होते. परंतु, आज ९ जुलै रोजी गृहमंत्रालयाने किरिथिका यांच्या बदलीचे सुधारित आदेश काढत त्यांची डीसीपी म्हणून नाशिक शहरात बदली केली. तर नागपुर अप्पर पोलिस अधिक्षक रमेश यांना अमरावती पोलिस ग्रामीणचे धुमाळ आयुक्तालयात डीसीपी म्हणून पाठविण्यात आले आहे. आता आयुक्तालयात गणेश शिंदे व रमेश धुमाळ हे दोन डीसीपी काम पाहणार आहे. मनपा निवडणूकीची आचार संहिता सुरू होण्यापूर्वी आयुक्तालयात तिसऱ्या डीसीपींची बदली होणार असल्याचे सुत्रांकडून समजते.

# महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी मोदी हॉस्पिटलला दिली अचानक भेट

## अनुपस्थित कर्मचाऱ्यांना नोटीस देण्याचे आदेश

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१०अमरावती** - अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी नुकतीच मोदी हॉस्पिटलला अचानक भेट देत रुग्णसेवा, स्वच्छता आणि कर्मचाऱ्यांची उपस्थिती यांची सविस्तर पाहणी केली.या भेटीत आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी ड्युटीवर असतांनाही अनुपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांकडे विशेष



लक्ष केंद्रित केले. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना अशा कर्मचाऱ्यांना त्वरित कारणे दाखवा नोटीस देण्याचे स्पष्ट आदेश दिले. हा निर्णय रुग्णालयातील शिस्त व कार्यक्षमता सुधारण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.तसेच, आयुक्तांनी रुग्णालयातील स्वच्छता, वैद्यकीय सुविधा व रुग्णसेवेच्या दर्ज्याचा आढावा घेतला. आवश्यक तेथे तत्काळ सुधारणा करण्याचे निर्देश देत, रुग्णसेवा अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख व्हावी यावर त्यांनी भर दिला.शासनाच्या आरोग्यसेवा धोरणानुसार, सार्वजनिक रुग्णालयांत शिस्तबद्ध सेवा देणे अत्यावश्यक आहे, आणि त्यासाठी कठोर पावले उचलली जातील, असे संकेतही त्यांनी दिले. या भेटी दरम्यान उपायुक्त योगेश पिठे उपस्थित होते.

# आजपासून दुसऱ्या प्रवेश फेरीला सुरुवात

## १३ जुलैपर्यंत करा अर्जअकरावी प्रवेश प्रक्रिया

### जिल्ह्यात १२ हजार १४ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित

विदर्भ प्रजासत्ताकदि.१०अमरावती १६अकरावी प्रवेश प्रक्रियेतसाठी पहिल्या फेरीची अंतिम निवड यादी तांत्रिक कारणामुळे वेळेवर यादी जाहीर झाली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. बदललेल्या वेळापत्रकानुसार ३० जूनला यादी जाहीर होणार होती. मात्र, २८ जून रोजीच यादी जाहीर झाली. त्यानुसार आजवर जिल्ह्यात १२ हजार २५६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत तर २९ हजार जागा अजूनही रिक्त आहेत.

यंदा जिल्ह्यात ४२ हजार १८० जागा आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अद्यापही बाकी आहेत. अशांसाठी १० ते १३ जुलैपर्यंत दुसरी प्रवेश फेरी राबविण्यात येत आहे. अशी माहिती प्रवेश समन्वयक प्रा. अरविंद मंगळे यांनी दिली आहे. जिल्ह्यात यंदा अकरावीची प्रवेश



प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील ३१० कनिष्ठ महाविद्यालयांमधील ४२ हजार १८० जागांसाठी आतापर्यंत ३० हजारांवर विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.यावर्षी तांत्रिक अडचणीमुळे अकरावी प्रवेशाला उशीर झाला. ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश व्हायचे आहेत. त्यांच्या करिता प्रवेशाचे वेळापत्रक (दुसरी फेरी) राबविण्यात आल्याची माहीती प्रवेश समन्वयक प्रा. अरविंद मंगळे यांनी कळविली आहे. त्यानुसार प्रवेशासाठी नोंदणी व पसंतीफॉर्म आज १० जुलै ते १३ जुलैपर्यंत भरणे आहेत. त्यानंतर गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचे संबंधीत कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश १८ ते २१ जुलैपर्यंत घ्यायचे आहेत.

# अमरावतीत मुसळधार पावसाचा कहर

## बालकाचा मृत्यू, ५५० हेक्टर पिकांचे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

गेल्या तीन दिवसांपासून पावसाची रिपरीप सतत सुरु असल्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मोर्शी तालुक्यातील हिवरखेड येथे भिंत पडून एका बालकाचा मृत्यू झाला. जिल्हाभरात ५५ घरांची पडझड झाली. तिकडे जलसाठ्याने मर्यादा ओलांडल्यामुळे पूर्णा आणि सपन धरणाची दोन दारे उघडण्यात आली असून नदीवरील पूल पाण्याखाली आल्याने नागपुर-छत्रपती संभाजीनगर महामार्गाची वाहतूक थांबविण्यात आली आहे. कृषी आणि महसूल विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार जिल्ह्यातील साडे ५०० हेक्टरमधील पिकेही नष्ट झाली.



संततधार पावसामुळे अनेकांना घराबाहेर पडता आले नाही. दरम्यान आज, बुधवारी सकाळी ८ वाजता पूर्ण झालेल्या २४ तासांत तिवसा आणि धामणगाव रेल्वे तालुक्यात अतिवृष्टीची नोंद करण्यात आली. धामणगाव तालुक्यात ७९.१ मिलीमीटर तर तिवसा तालुक्यात ६९.१ मिलीमीटर पाऊस पडला. धामणगावात अधिक पाऊस पडल्याने या तालुक्यातून वाहणाऱ्या खोलाड नदीला पूर आला. त्यामुळे रायपुर (कासारखेडा)-देवगाव जवळचा या नदीवरील पुल पुरात बुडाला. हा पुल नागपूर - छत्रपती संभाजीनगर महामार्गावर आहे. दरम्यान पुल पाण्याखाली आल्याने तहसीलदार यांच्या आदेशान्वये त्या मार्गावरील वाहतूक थांबविण्यात आली आहे.

**हिवरखेडमध्ये बालकाचा मृत्यू, महिला जखमी**

पावसामुळे जिल्ह्यातील ५२ घरे अंशत: तर तीन घरे पूर्णत: जमीनदोस्त झाली. यातील एक घर हे मोर्शी तालुक्यातील हिवरखेडचे आहे. सदर घराची भिंत अंगावर पडल्याने ३ वर्षीय बालक स्वरुप प्रशांत गांजरे याचा मृत्यू झाला. तर त्याच कुटुंबातील ३९ वर्षीय महिला रेखा सुखदेव गांजरे जखमी झाल्या. त्यांच्यावर उपचार सुरु आहे.

**५५० हेक्टर पिकांचे नुकसान**

पावसामुळे शेतीचेही मोठे नुकसान झाले. जिल्ह्यातील ५५० हेक्टरमधील कापूस आणि सोयाबीन बाधित झाल्याचे महसूल व कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालाचे म्हणणे आहे. शेती नुकसानाचा मोठा फटका धामणगाव रेल्वे तालुक्याला बसला. या तालुक्यातील कापूस-सोयाबीनचे ४४१ हेक्टर क्षेत्र अक्षरश: खरडून गेले. सततच्या पावसामुळे धरणांमधील जलसाठाही वाढला. परिणामी अचलपुर तालुक्यातील सपन धरणाची दोन दारे १० सेंटीमीटर उंचीने तर चांदूर बाजार तालुक्यातील पूर्णा मध्यम प्रकल्पाची दोन दारे ५ सेंटीमीटर उंचीने उघडण्यात आली. दोन्ही धरणाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात आल्याने नदी काठावरील रहिवाशांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

# निराधार योजनेचा लाभ, कागदपत्रे जमा न केल्यास अनुदान होणार बंद

## दर्यापुरात ७७३ निराधार लाभार्थीचे प्रमाणीकरण प्रलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

तालुक्यातील विशेष निराधारांना अर्थसहाय्य योजनेअंतर्गत श्रावणबाळ, राज्य सेवा निवृत्ती योजना, संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी राष्ट्रीय निवृत्ती वेतन व इंदिरा गांधी अपंग निवृत्ती वेतन योजनेच्या लाभार्थ्यांचे ई-आधार कार्ड, केवायसी केलेले बँक खाते क्रमांक, मोबाईल नंबर, सूक्ष्म चौकशी अर्ज, तलाठ्याने दिलेल्या माहितीचा अर्ज ही कागदपत्रे तहसीलच्या संजय गांधी निराधार योजना विभागाकडे तत्काळ जमा करावीत. मात्र, अजूनही लाभार्थ्यांनी कायदपत्रे जमा केले नाही. संजय गांधी व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना शासनाच्या वतीने डीबीटी पोर्टलच्या माध्यमातून थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदान वाटप करण्यात येत आहे. यासाठी सात ते आठ महिन्यांचा कालावधी उलटूनही तालुक्यातील ७७३ लाभार्थ्यांनी अजूनही कागदपत्रे जमा केलेली नाहीत. अशी माहिती निवासी नायब तहसीलदार प्रमोद काळे यांनी दिली.



श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनेत दर्यापूर तालुक्यातील १५,८६१ लाभार्थी असून, यापैकी १४,८३८ एवढी डीबीटी पोर्टलवर अपलोड लाभार्थी संख्या आहे. यापैकी संजय गांधी विभागाकडून केवळ २०३ लाभार्थ्यांचे आधार सिंडींग करणे बाकी आहे. मात्र, या विभागाकडून शेकडो आधार सिडींग करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु आहे. आतापर्यंत १४ हजार ८३८ लाभार्थीचे ई-आधार प्रमाणिकरण करण्यात आले आहे. श्रवणबाळ योजनेचे ९ हजार ९८१ लाभार्थी तर संजय गांधी निराधार योजनेचे ५,८८० लाभार्थी असून, लाभार्थ्यांचे ई-आधार, बँक खाते, मोबाईल क्रमांक, केवायसी अपलोड करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कागदपत्रे जमा करण्यासाठी व लाभार्थ्यांना येणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी ९ जुलै रोजी दर्यापूर येथील तहसील कार्यालयात विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.

प्रलंबित लाभार्थ्यांनी कागदपत्र जमा करावी. असे संजय गांधी निराधार योजनेचे प्रभारी नायब तहसीलदार प्रमोद काळे यांनी सांगितले. आता लाभार्थ्यांना डीबीटीच्या माध्यमाने शासनाकडून डायरेक्ट खात्यात अनुदान जमा करण्यात येत आहे. या योजनांतील ७७३ लाभाथ्यर्थ्यांनी आठ महिन्याचा काळ उलटून देखिल कागदपत्रे जमा न केल्याने त्यांचे अनुदान बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लाभार्थ्यांनी तत्काळ कागदपत्रांची पूर्तता करावी. तसेच तहसील कार्यालयात जमा करावी. अन्यथा लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचे मिळत असलेले अनुदान बंद होवू शकते. अशी माहिती संजय गांधी निराधार योजनेच्या सुत्राने दिली आहे. लाभार्थ्यांना या योजनेचे अनुदान सुरू ठेवण्यासाठी कागदपत्रे सादर करावी. त्यांनी आपले नुकतेच अपडेट केलेले युआयडी क्रमांक असलेले ई-आधार कार्ड, बँकेची केवायसी, बँक खाते क्रमांक, आणि आपला भ्रमणध्वनी क्रमांक हे पाच प्रकारचे कागदपत्र तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार योजनेच्या विभागाकडे किंवा अव्वल कारकून वर्षा नवलकार व आनंद चक्रे यांच्याकडे तत्काळ जमा करावे, असे आवाहन तहसील प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# हिवरखेड येथे भिंत अंगावर कोसळून नातवाचा मृत्यू: आजी गंभीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मोर्शी**

येथून १०किलोमीटर अंतरावर असलेल्या हिवरखेड येथील एका ३ वर्षीय बालकाच्या अंगावर भिंत कोसळून त्याचा जागीच मृत्यू झाला असून वृद्ध महिला गंभीर जखमी झाल्याची घटना ८ जुलै रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास घडली.



स्वरूप प्रशांत गांजरे रा. माळीपुरा हिवरखेड असे मृतक बालकाचे नाव आहे. ८ जुलै रोजी रात्री स्वरूप प्रशांत गांजरे हा तीन वर्षीय बालक आपली आजी रेखा सुखदेवराव गांजरे हिचे सोबत अवधूत मंदिरात देवदर्शनासाठी जात असताना रस्त्यावर असलेल्या सुरेंद्र खेरडे यांच्या घराची शिकस्त भिंत स्वरूप यांच्या अंगावर पडली व त्याचा विटा- मातीखाली दबून दुर्दैवी मृत्यू झाला. या अचानक झालेल्या अपघातात स्वरूपच्या आजीला डोक्याला गंभीर मार बसल्यामुळे तिला मोर्शी येथील खाजगी रुग्णालयातून अमरावती येथे हलविण्यात आले असून तिची प्रकृतीसुद्धा चिंताजनक असल्याचे सांगण्यात येते. घटनेची माहिती मिळताच तहसीलदार विनोद वानखडे व महसूल अधिकारी हिवरखेड यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी करून पंचनामा केला.

# मोखड व शिरपूर येथे 'बळीराजा संवाद' अभियानांतर्गत शेतकरी सभेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०नांदगाव खंडेश्वर**

अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खं. तालुक्यात मौजा मोखड व शिरपूर येथे मंगळवार ८ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता हनुमान मंदिरात 'बळीराजा संवाद अभियान' अंतर्गत शेतकरी सभेचे आयोजन करण्यात आले होते. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून तसेच तालुका कृषी अधिकारी सागर इंगोले व मंडळ कृषी अधिकारी अनिल वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या सभेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना कृषीविषयक विविध योजनांची



माहिती देणे आणि त्यांच्या शेतीसंबंधित समस्या जाणून घेऊन त्यावर मार्गदर्शन करणे हा होता.


या सभेला गावातील ग्रामपंचायत सदस्य, संताजी शेतकरी बचतगटाचे सदस्य आणि मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.कृषी विभागाचे अधिकारीही याप्रसंगी उपस्थित होते. यामध्ये उपकृषी अधिकारी उदय गावंडे, सुनील शिरसाट, सहायक कृषी अधिकारी अनिल पोच्छी आणि सचिन आंधळे यांचा समावेश होता. कार्यक्रमाची सुरुवात सहायक कृषी अधिकारी अनिल पोच्छी यांच्या मार्गदर्शनाने झाली. त्यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना दिली.

या संवाद अभियानामुळे शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या अनेक महत्त्वाच्या योजनांची थेट माहिती मिळाली. या माहितीचा उपयोग करून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीचे उत्पन्न वाढविण्यात निश्चितच मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. अशा प्रकारच्या संवाद कार्यक्रमांमुळे शासन आणि शेतकरी यांच्यातील दुरावा कमी होऊन - विकासाला गती मिळेल, असे मत उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केले.

# अमरावतीकरांना सूर्यदर्शन झाले दुर्मिळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती :**

गेल्या चार दिवसांपासून अमरावतीसह जिल्ह्यात पावसाची झडी सुरु आहे. त्यामुळे शहर व परिसरात सूर्यदर्शन दुर्मिळ झाले आहे. हवामान खात्याने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार ही झडी आगामी १२ जुलैपर्यंत कायम राहणार असून त्यानंतर काही दिवसांची उघडीप राहणार आहे. दरम्यान गेल्या २४ तासांत जिल्ह्यात ३६.४ मिलीमीटर पाऊस नोंदला गेला असून आतापर्यंतचा एकूण पाऊस १२७.७ मिलीमीटरवर पोहचला आहे. जिल्हा प्रशासनाने १ जूनपासूनच्या या मोसमातील पावसाची मोजदाद केली आहे. या



मोजदादनुसार एकूण पाऊस १२७.७ मिलीमीटरवर पोचला असला तरी तो सरासरीपासून अद्याप दूर आहे. महसूलच्या नोंदीनुसार आजपर्यंत जिल्ह्यात २१७.३ मिलीमीटर पाऊस पडायला हवा होता: परंतु बहुतेक तालुक्यात पावसाने सरासरी न गाठल्यामुळे अशी आकडेवारी समोर आली आहे.८ जुलैच्या सकाळी झालेल्या नोंदीनुसार वरुड, अंजनगाव सुर्जी व चांदूरबाजार या तीन तालुक्यांनीच सरासरी ओलांडली. दरम्यान तिवसा व दर्यापूर हे दोन तालुके सरासरीपयर्यंत पोचले आहेत. तिवस्यात आतापर्यंत १७८. १ मिलीमीटर पाऊस पडायला हवा होता; परंतु प्रत्यक्ष पडलेला पाऊस १७२. २ मिलीमीटर आहे, तर दर्यापूरमध्ये १५६.२ मिलीमीटर पडणे अपेक्षित असताना तो १५०.१ मिलीमीटरवर थांबला आहे.

# उघडे डीपी बॉक्स ठरताहेत धोकादायक : महावितरण करीत आहे कानाडोळा, नागरिकांमध्ये नाराजीचा सूर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अचलपूर**

तालुक्यातील ग्रामीण व शहरातील अनेक ठिकाणी विद्युत डीपी बॉक्सचे दरवाजे उघडे असल्याने तसेच, दरवाजे नसल्याने ते धोकादायक ठरत आहेत. अशा परिस्थितीत अपघात झाल्यास जबाबदार कोण? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

शिदी, पोही, कुष्ठा, काकडा, पथ्रोटातील अनेक परिसरात अशा अनेक उघड्या डीपी आहेत. याबाबत परिसरातील नागरिकांनी महावितरणला अनेकवेळा तक्रारीकेल्या आहेत; परंतु याकडे महावितरण कानाडोळा करीत असल्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. डीपी ही मृत्यूचा सापळा बनली आहे. बेगमपुरागाडगे रेशन दुकानजवळील येथे उपड्या असलेल्या डीपी शेजारी सतत गर्दी पाहायला मिळते, तसेच याठिकाणी असलेल्या दुकानांमध्ये ग्राहकांची गर्दी असते. जवळच असलेल्या डीपी मुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे.

## दुरुस्तीसाठी टाळाटाळ

डीपीचे झाकण तुटले किंवा नादुरुस्त असल्यास ते पुन्हा योग्य करण्याची जबाबदारी महावितरणची आहे; मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. दुर्घटना घडण्याची वाट पाहण्यात महावितरण वेळ पालवत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. शहरासह गावठाण डीपी, इतर विद्युत साहित्य वाहिन्या व यंत्रणा अद्ययावत करणे गरजेचे आहे. याकडेही वरिष्ठांसह महावितरणने लक्ष देणे आवश्यक आहे.

**दिलीप राऊत, शहराध्यक्ष भाजप अनु. जाती सेल**

# मोर्शीत स्वच्छता अभियानाचा फज्जा : क्यूआर क्यूआर कोडचा खर्च व्यर्थ, कचरा बनला डोकेदुखी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मोर्शी**

स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत शहरातील ओला व सुका कचरा उचलताना घराच्या भिंतीवर विशिष्ट कोड लावण्याचे काम मोर्शी शहरातील अनेक भागात झालेले आहेत. दैनंदिन घनकचरा संकलनाच्या मॉनिटरिंगसाठी शहरात आयसीटी प्रणाली कार्यरत करण्यासाठी हे क्यूआर कोड लावले आहे. या क्यूआर कोडवर नगरपालिकेने केलेला खर्च हा व्यर्थ गेल्याचे स्पष्ट होत आहे.

यामुळे शहरातील कचरा संकलन करण्यासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना कचरा संकलन केल्यानंतर हे कोड स्कॅन करावे लागणार आहेत. त्यामुळे कोणत्या भागातील कचरा कधी व केव्हा उचलला गेला, याची माहिती तातडीने मिळणार आहे. त्यामुळे कचरा संकलनात नियमितता येईल, अशी अपेक्षा होती: परंतु मागील अनेक महिन्यांपासून हे क्यूआर कोड कोणीच स्कॅन करीत नसल्याने या मोहिमेवर लावलेला पैसा पाण्यात गेला काय? असा प्रश्न या निमित्ताने उभा झालेला आहे.

मोर्शी शहरामध्ये स्वच्छता राहावी. यासाठी कचरा गाडीमार्फत घराघरातून कचरा संकलन केला जातो. हा कचरा व्यवस्थित संकलन केला जावा, यासाठी विशिष्ट प्रणाली अंमलात आणण्यात आली. यामध्ये क्यूआर कोडचे स्टिकर शहरातील अनेक घरासमोरच्या भिंतीवर लावण्यात आलेली आहे. कचरा संकलन




केल्यानंतर तो क्यूआर कोड स्कॅन करावा म्हणजेच या घरातील कचरा उचललेला आहे, याची माहिती होणार आहे. परंतु गेल्या अनेक महिन्यांपासून हा क्यूआर कोड उपयोगात आणलेला नाही.

काही महिन्यांपूर्वी कंत्राटदाराचा एक कर्मचारी येऊन क्यूआर कोड स्कॅन करून निघून आयचा. यावेळी त्या घरातून कचरा संकलित केला काय किंवा नाही याच्याशी त्याला काही घेणेदेणे नव्हते. त्यामुळे दुपारी किंवा संध्याकाळी कधी येऊन तो त्या घराच्या समोरील क्यूजार कोड स्कॅन करून घेऊन जायचा.परंतु मागील अनेक महिन्यांपासून घराच्या दर्शनी भागावर लावलेला क्यूआर कोड तसाच पडलेला आहे. पूर्वी शहरात दररोज सकाळी कचरा गाडी येऊन प्रत्येक वार्डातील कचरा घेऊन जायची. परंतु कंत्राटदाराला पूर्ण प्रभागातील कचरा संकलन करण्याचे कंत्राट दिल्यावरसुद्धा अवघ्या चारख गाड्यावर मोर्शी शहरातील कचरासंकलित केल्या जायचा. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. याबाबतीत वृत्तपत्रात वृत्त प्रकाशित झाल्याने या गाड्यांमध्ये वाढ करून क चरा गा ड चा वाढवल्या.तरीही कॉलनी परिसरात दररोज कचरागाडी न येता एक दिवसाआड कचरा संकलन करण्यासाठी गाडी येते. कधी-कधी दोन ते तीन दिवससुद्धा कचरा गाडीला वेळ लागतोच. त्यामुळे त्या दिवसांत कचरा साठवताना नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. या सर्व गोष्टींवर आळा बसावा, यात्ताठी शासनातर्फे लाखो रुपये खर्च करून क्यूआर कोड ही मोहीम उपयोगात आणलेली आहे: परंतु याचा पूर्ण उपयोग न केल्या जात असल्यामुळे लाखो रुपये खर्च केलेल्या या मोहिमेचा फज्जा उडाला असून या मोहिमेवर खर्च केलेले लाखो रुपये पाण्यात गेले आहे असे सध्या तरी दिसून येते.

# मुलगा भोवरा फिरवतोय हेही टॅलेंटच शैक्षणिक धोरणात नवा दृष्टिकोन

## मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसह सामाजिक, शारीरिक प्रगतीचे होणार निरीक्षण

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये २०२५ या शैक्षणिक वर्षापासून 'समग्र प्रगती पत्रक' ही संकल्पना राबविण्यात येत आहे. त्याचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी फायदा होणार आहे. मुलगा भोवरा फिरवतोय किंवा लंगडी खेळतोय, हेदेखील टॅलेंट म्हणून पाहिले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांची सामाजिक, भावनिक,



आणि शारीरिक प्रगतीदेखील दर्शवणारे मूल्यांकन केले जाणार आहे. यात केवळ गुण किंवा ग्रेडवर लक्ष केंद्रित न करता, विद्यार्थ्यांची कौशल्ये, क्षमता आणि त्यांची एकूण वाढ कशी होत आहे यावर लक्ष दिले जाणार आहे. या सर्व बाबी समग्र प्रगती पत्रकात पाहायला मिळणार आहे. विद्यार्थी, शिक्षक आणि समूहातून मूल्यांकन करण्याची ही पद्धत आहे.बहुआयामी दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांचे मूल्यांकन केले जाणार आहे. विद्यार्थ्यांचा केवळ शैक्षणिकच नाही, तर भावनिक, सामाजिक आणि शारीरिक विकासदेखील साधला जाणार आहे.

**भोवरा फिरवणे, दांडपट्टा चालवण्यालाही महत्त्व**

शिक्षणाबरोबरच भोवरा फिरवणे, लंगडी खेळणे, इतर खेळ, दांडपट्टा फिरविणे आदी विविध कौशल्ये मुले कशी प्राप्त करतात. याचे निरीक्षण या समग्र पत्रकात नोंदविले जाणार आहे.समूह शिक्षणातून विद्यार्थ्यांचा विकास करणे हा उद्देश आहे.सामूहिक कवायती, प्रार्थना, कविता, वाचन, गायन यातून मुलांना सक्षम केले जाणार आहे.

# मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे शिक्षणासोबतच संस्कारही रुजतात -सरन्यायाधीश भूषण गवई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०नागपूर**



सध्या महाराष्ट्रात 'हिंदीची सक्ती' आणि 'मराठी अस्मिता' या मुद्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. या वादाची सुरुवात राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाने झाली, ज्यामध्ये इयत्ता १ ते ५ पर्यंतच्या शाळांमध्ये त्रिभाषा सूत्रांतर्गत हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. यावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी तीव्र आक्षेप घेतला.

त्यांनी जवळपास २० वर्षांनंतर एकत्र येत हिंदीच्या सक्तीविरोधात संयुक्त आंदोलनाची घोषणा केली. हा निर्णय मराठी अस्मितेवर घाला असल्याचा आरोप करत दोन्ही पक्षांनी सरकारवर टीकेची झोड उठवली. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी ५ जुलै रोजी मुंबईत याविरोधात सभा घेतली आणि मराठीचा आवाज बुलंद केला. या सभेनंतर आता देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी देखील मराठी भाषेबाबत मोठे वक्तव्य केले आहे.

न्या.गवई यांनी मे महिन्यात सरन्यायाधीश पदाची शपथ घेतली होती. मूळत: महाराष्ट्रातील रहिवासी असल्याने न्या.गवई यांचा राज्यात विविध ठिकाणी सत्कार केला जात आहे. अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर मध्ये सत्कार सोहळा आयोजित झाल्यावर न्या.गवई सध्या मुंबईच्या दौऱ्यावर आहे. त्यांच्या मुंबई दौऱ्यापूर्वी मराठी विषयावरून राज्यात राजकारण तापले आहे. हिंदी भाषेच्या सक्तीवरून सत्तापक्ष आणि विरोधी पक्षांमध्ये शाब्दिक चकमक सुरू आहे. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी मराठी भाषेबाबत विचार व्यक्त केले. न्या.भूषण गवई यांनी सांगितले की आज मी ज्या उंचीवर पोहोचलो आहे, त्यामागे माझ्या शिक्षकांचे आणि शाळेचे फार मोठे योगदान आहे.

याच शाळेतील संस्कारामुळे माझ्या आयुष्याला योग्य दिशा मिळाली. वक्तृत्वाची सुरुवातीची पावले याच व्यासपीठावर पडल्याची आठवण त्यांनी सांगितली. वक्तृत्व स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमांमधून आत्मविश्वास मिळाला. त्या संधींमुळेच मी घडलो. मी स्वतः मराठी माध्यमातून शिकलेला विद्यार्थी आहे. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे विषयांची समज अधिक पक्की होते. शिक्षणासोबतच संस्कारही रुजतात, हेच संस्कार आयुष्यभर साथ देतात, असा आत्मविश्वास देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी विद्यार्थ्यांना दिला. त्यांनी गिरगाव येथील विद्यालयाला भेट देत आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. प्राथमिक ते माध्यमिक शिक्षण घेतलेल्या या विद्यालयात पुन्हा पाऊल ठेवताना सरन्यायाधीश गवई यांनी आपली जडणघडण करणाऱ्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

# तीन आरएफओंना रुजू करून घेण्यास टाळाटाळ

## शासन आदेशाची पायमल्ली, आयएफएस यांचा मनमानी कारभार केव्हा थांबणार?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

राज्य शासनाच्या बदली आदेशानुसार वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या (आरएफओ) बदल्या करण्यात आल्या. मात्र, काही ठिकाणी आरएफओंना अद्यापही रुजू करून घेण्यात आलेले नाही. आरएफओंनी एकतर्फी पदभार स्वीकारत कारभार सुरू केला असला तरी उपवनसंरक्षकांना ते मान्य नाही. त्यामुळे आरएफओ विरुद्ध उपवनसंरक्षक असा संघर्ष उभा ठाकला आहे.



नांदेड वन विभागात बदलीनंतरही आरएफओंना रुजू का करून घेतले जात नाही? याविषयी त्वरेने माहिती जाणून घेतो. लवकरच या संदर्भात तोडगा काढून शासन आदेशाची अंमलबजावणी केली जाईल. कोणावरही अन्याय होणार नाही.

**– ऋषिकेश रंजन**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामान्य प्रशासन)**

शासनाच्या वन व महसूल विभागाने ३० मे रोजीच्या बदली आदेशानुसार मंगेश पाटील (भोकर प्रादेशिक), गणेश शेवाळे (नांदेड प्रादेशिक), रामराव देवकते (देगलूर प्रादेशिक) यांची पदस्थापना होऊन महिनाभरापेक्षा जास्त कालावधी झाला. मात्र, नांदेड वन विभागाच्या उपवनसंरक्षकांनी या तिघांना अद्यापही रुजू करून घेतलेले नाही. आरएफओ आर. एस. देवकते यांनी देगलूर वनपरिक्षेत्राचा एकतर्फी कार्यभार घेतल्यानंतर २३ जून २०२५ रोजी नांदेड उपवनसंरक्षकांना पत्राद्वारे कळविले होते. एवढेच नव्हे तर या संदर्भातील माहिती शासनाच्या कार्यासन अधिकाऱ्यांना पाठविली होती. असे असताना नांदेड वन विभागाचे उपवनसंरक्षक बदलीने पदस्थापना झालेल्या या तीनही आरएफओंना रुजू करून घेण्यास नकार देत असल्याची माहिती आहे.

# दारू ,गुटखा विक्री करणाऱ्या सोबतच संबंधित यंत्रणेवरही कारवाई करा

## आ प्रतापदादा अडसड यांची विधानसभेत मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०धामणगाव रेल्वे**

ड्रग्स, अप्पू ,दारू, गुटखा हे विक्री करणाऱ्या लोकांवर कारवाई करताना ज्या च्या आशीर्वादाने हे धंदे सुरू आहे त्या यंत्रणे च्या अधिकाऱ्यावर कारवाई करा अशी मागणी विधानसभेत आमदार प्रतापदादा अडसड यांनी केली



पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यात राज्य शासनाच्या वतीने आज गुरुवारी अमली पदार्थावर अंकुश लावण्यासाठी संघटित गुन्हेगारावर कारवाई करण्याचे विधेयक चर्चेला आले या विषयावर विधानसभेत बोलताना आ अडसड म्हणाले की ड्रग्स दारू गुटख्यामुळे बारा ते तेरा वर्षातील पिढी उध्वस्त होत आहे या मुलांना प्रथम चॉकलेटचे आमिष दाखवीत व्यसनाधीन केले जाते जन्मदात्यांना मारण्याच्या धमक्या सुद्धा दिल्या जातात संबंधित हे रॅकेट कार्यरत असून जी चेन क्रॅक करायची आहे त्या चेनमध्ये प्रशासनातील अधिकारी सहभागी असतात त्यामुळे योग्य ती कारवाई होत नाही संबंधित क्षेत्रात जिथे अवैद्य धंदे सुरू आहे तेथील अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई करावी नोकरीत नियुक्ती वेळेची संपत्ती आणि आता असलेल्या संपत्तीची आयकर विभागातर्फे चौकशी करावी अशी मागणी त्यांनी विधानसभेत केली

**लोणी टाकळीच्या गुटखा गोडाऊन चा मुद्दा विधानसभेत**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोणी टाकळी येथे मध्य प्रदेशातून गुटका येतो येथील गोडाऊन मधून संपूर्ण गुटखा अमरावती जिल्ह्यात पोहोचविल्या जाते . या संदर्भात अन्न औषधी प्रशासन, पोलीस प्रशासन यांना वारंवार माहिती देऊन ही कोणतीच कारवाई केल्या जात नाही संबंधित अधिकाऱ्यावर त्वरित कारवाई करण्याची मागणी आमदार प्रतापदादा अडसड यांनी विधानसभेत केली.

# स्वच्छ भारत अभियानांतर्गत प्लास्टिक जप्ती मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

मध्य झोन क्र.२, राजापेठ अंतर्गत सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर यांच्या उपस्थितीत कॉटन मार्केट, चौधरी चौक परिसरात प्लास्टिक वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान, परिसरातील फुलविक्रेत्यांकडून मोठ्या प्रमाणात प्लास्टिक जप्त करण्यात आले असून, संबंधित विक्रेत्यांना सक्त ताकीद देण्यात आली. तसेच, हातगाडी धारकांना डस्टबिन ठेवणे आवश्यक असल्याचे निर्देश व नोटिसा देण्यात आल्या. स्वच्छ भारत अभियानांतर्गत ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली असून, नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. सदर मोहिमेत नोडल अधिकारी विकी जेधे, जेष्ठ स्वच्छता निरीक्षक विजय बुरे, राजु डिक्याव, स्वच्छता निरीक्षक यांची सक्रिय उपस्थिती होती.

महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात येते की, प्लास्टिकचा वापर टाळावा व सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखावी.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा नेत्रदान संकल्पात उच्चांक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने कुलगुरू डॉ. मिलिंद बारा यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाने नेदान संकल्पना उच्चांक यशस्वी असून, राज्यपाल कुल कार्यालयाने उद्दिष्ट अधिकाधिक जणांनी आपला संकल्प केला आहे.



भारताचे श्री नरेंद्र मोदी यांच्या दिग्दर्शनाने महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठ कुलपती कार्यालयाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला तीनशे दात्यांचे नेत्रदान संकल्पपत्र भरुन मला मिलविले होते. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते आणि नेतृत्व विद्यापीठातील अधिकारी कर्मचारी, शिक्षक यांनी ४२६ उदाहरणे उद्दिष्ट त्यांच्या अधिक नेत्रदानाचे संकल्पपत्र भरून विद्यापीठाचे आरोग्य केंद्र प्रदान व आरोग्य केंद्राने सर्वजण ४२६ जणांचे नेत्रदान राज्याचे संकल्पपत्र कार्यालयाला पाठविले आहे. यासाठी विद्यापीठ आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात व त्यांच्या चमूने अथक परिश्रम घेतले. कुलगुरू डॉ. मिलींद बाराते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी नेत्रदानाचे संकल्पपत्र भरून देणा-या सर्वांचे अभिनंदन केले आहे.

# प्रादेशिक परिवहन कार्यालयात अधिकारी नसल्याने वाहनधारक त्रस्त

## दलालराज बोकाळला!भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे जिल्हाध्यक्ष राजू चिरडे यांची तीव्र प्रतिक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

प्रादेशिक परिवहन कार्यालय अमरावती येथे कायमस्वरूपी अधिकारी नसल्यामुळे वाहनमालकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत असून, त्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. यासंदर्भात भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे जिल्हाध्यक्ष राजू चिरडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, कायमस्वरूपी अधिकारी नेमून दलालराज संपुष्टात आणावा, अशी जोरदार मागणी त्यांनी केली आहे. सध्या दुसऱ्या जिल्ह्यातील अधिकाऱ्यांची आंतरजिल्हा नियुक्ती या कार्यालयात करण्यात आली आहे. हे अधिकारी केवळ आठवड्यात दोन दिवस अमरावती कार्यालयामध्ये उपस्थित राहतात आणि उर्वरित काळात आपल्या मूळ जिल्ह्यात परत जातात. त्यामुळे दोन दिवसांमध्ये मर्यादित वाहनच तपासले जातात, तर उर्वरित



वाहनधारकांना पुढील आठवड्याची वाट पाहावी लागते. यामुळे दलाल मंडळी सक्रिय होत असून, वाहनधारकांना कमिशनच्या बदल्यात लवकर पासिंग करून देण्याचे आमिष दाखवले जाते, असा गंभीर आरोप राजू चिरडे यांनी केला आहे. कमिशन दिल्यास वाहन लगेच पासिंग होते, नाहीतर आठवडाभर थांबा अशी परिस्थिती असून, हा प्रकार सर्वसामान्य वाहनधारकांसाठी अन्यायकारक आहे, असे ते म्हणाले. या कार्यालयात पूर्णवेळ अधिकारी नेमला गेला नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरून आंदोलन करू. दलालांचा सुळसुळाट थांबवण्यासाठी ठोस पावले उचलावी लागतील.अमरावती कार्यालयात सध्या सुरू असलेली ही परिस्थिती वाहनधारकांच्या संयमाचा अंत पाहणारी ठरत असून विभागाने तातडीने लक्ष द्यावे अशी मागणी राजू चिरडे यांनी केली आहे.

# विदर्भातील विकासाचा अनुशेष दूर करतांना अमरावती विभागाचा समतोल विकास साधावा; आ.संजय खोडके यांची विधानपरिषदेतून लक्षवेधी चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

राज्यातील विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी राज्यघटनेचा आधार घेऊन केंद्र शासनाच्या निर्णयानुसार विदर्भ मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. या भागांचा अनुशेष भरून काढण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत राज्यपालांमार्फत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असल्याचे निवेदन शासनाच्या वतीने राज्यविधिमंडळात करण्यात आले आहे. मात्र या प्रस्तावात वैधानिक हा शब्द गाळण्यात आला असल्याची बाब महाराष्ट्र राज्य विधानपरिषद सदस्य आ.संजय खोडके यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.विदर्भातील विकासाचा अनुशेष दूर करतांना अमरावती विभागाचा समतोल विकास साधावा, अशी मागणी सुद्धा आ. संजय खोडके यांनी अधिवेशनातून केली आहे.

अधिवेशनात बोलतांना आ. संजय म्हणाले कि, शासनाच्या वतीने जे निवेदन करण्यात आले आहे. त्यामध्ये वेगवेगळे शब्द वापरण्यात आले आहे. एका ठिकाणी विदर्भ , मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास महामंडळ असे वापरले आहे. तर दुसऱ्या ठिकाणी वैधानिक महामंडळ असे नाव वापरण्यात आले आहे. त्यामुळे संभ्रमाची स्थिती निर्माण झाली असल्याने नेमका प्रस्ताव वैधानिक चा आहे कि विकास मंडळाचा आहे, या बाबत शासनाने स्पष्टीकरण द्यावं अशी सूचना आ. संजय खोडके यांनी केली. तसेच विदर्भ , मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास महामंडळांना अर्थसंकल्पातून निधीची तरतूद करण्यात येते. याकरिता सुत्राप्रमाणे



निधी वितरित करण्यात येतो. परंतु कामे न झाल्याने , मनुष्यबळ उपलब्ध न झाल्याने अथवा कामांच्या सुप्रमाणात निधी न मिळाल्याने हे बजेटचे पैसे सूत्राप्रमाणे खर्च होत नाही. त्यामुळे सुद्धा प्रश्न निर्माण झाला आहे. नागपूर विभाग आणि अमरावती विभागाबाबत सुद्धा सूत्र पाळण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. विदर्भ विकास वैधानिक महामंडळाच्या माध्यमातून विकासाचा अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न होत असतांना पूर्व विदर्भ म्हणजेच नागपूर विभाग सर्वच बाबतीत आघाडीवर आहे , त्यातुलनेत अमरावती विभाग मात्र मागासलेला राहिला आहे.महाराष्ट्र राज्यात दरडोई उत्पन्नामध्ये अमरावती विभाग हा अन्य विभागाच्या तुलनेत सर्वात मागे आहे. या महामंडळाच्या माध्यमातून अमरावती विभागात शेती, ग्रामीण विकास, सिंचन, ऊर्जा, आरोग्य, मूलभूत सुविधा या कामांना प्राधान्य देऊन विकासाचा अनुशेष भरून काढणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने आता अमरावती विभागासाठी सूत्राप्रमाणे काम करून विकासाचा समतोल साधावा , अशी भूमिका आ. संजय खोडके यांनी सभागृहासमक्ष स्पष्ट केली .यावर शासनाच्या वतीने उत्तर देतांना कृषी राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी सांगितले कि, विदर्भ , मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र अशा महामंडळांसाठी वैधानिक विकास महामंडळ असा शब्द वापरणे या राज्यघटनेचा आधार आहे. आणि सर्व बाबींवर महामहिम राज्यपालांचे नियंत्रण आहे. त्यामुळे प्रस्ताव पाठवत असतांना शब्दांचा फेरफार करता येत नाही. विधिमंडळात सदस्यांनी ज्या – ज्या बाबी निदर्शनास आणून दिल्या त्याची शहानिशा करण्यात येईल , असे राज्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच विदर्भातील अनुशेषाचा बाबतीत नागपूर विभाग व अमरावती विभागामध्ये विकासाचा समतोल साधण्यात येईल , असे उत्तर राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी दिले.